एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, गुरुवार २३ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४९, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 49 Marathi - Daily - Mumbai, 23 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
संतप्त महिलेचा मंत्री गिरीश महाजनांना रोष
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# भाजपाचे राजकारण! सुनेत्रा पवारांसाठी बारामतीला धाव
# मात्र अजित पवारांच्या कारखान्याला कर्ज नाकारले

■ मुंबई


**राज्य** सरकारने एकूण १४ कारखान्यांना कर्ज देण्याचा प्रस्ताव एनसीडीसीकडे पाठवला होता. यापैकी फक्त ७ कारखान्यांना कर्ज मंजूर झाले. उर्वरित ७ कारखान्यांचे प्रस्ताव विविध कारणांमुळे नामंजूर करण्यात आले. यामध्ये दिवंगत अजित पवार यांच्याशी संबंधित इंदापूर तालुक्यातील भवानी नगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या ३६१.४१ कोटी रुपयांच्या कर्ज प्रस्तावाला नकार देण्यात आला आहे. भाजपात असलेले पृथ्वीराज जाचक आणि अजित पवार समर्थकांनी एकत्र पॅनल करून निवडणूक लढवत हा कारखाना ताब्यात घेतला होता. मात्र, कारखान्याला कर्ज नाकारण्यात आले. त्याचबरोबर काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केलेले माजी आमदार संग्राम थोपटे यांच्याशी संबंधित राजगड




**केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाने (एनसीडीसी) ने महाराष्ट्रातील आर्थिक अडचणीत सापडलेल्या १४ पैकी सात सहकारी साखर कारखान्यांना कर्ज देण्यास नकार दिला आहे. यात अजित पवार यांच्या साखर कारखान्याला कर्ज दिलेले नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कालच दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना पोटनिवडणुकीत रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी करा, असे भाषण केले. हा पाठिंबा देण्यासाठी ते बारामतीला धावले होते. त्याचवेळी अजित पवारांच्या कारखान्याला आर्थिक मदत नाकारली. या भाजपाच्या राजकारणाची चर्चा सुरू आहे.**

सहकारी साखर कारखान्याचा तब्बल ४६७.८५ कोटी रुपयांचा प्रस्तावही फेटाळण्यात आला आहे. पक्षांतर करूनही कर्ज न मिळाल्याने थोपटे यांची राजकीय कोंडी झाल्याची चर्चा आहे. जालना येथील भाजपा नेते रावसाहेब दानवे यांचा रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचा १०६.०८ कोटींचा प्रस्तावही फेटाळण्यात आला. हा दानवे यांना धक्का आहे. धाराशिव येथील काँग्रेसचे माजी आमदार बसवराज पाटील यांचा श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना (७२ कोटी), सोलापूरमधील धर्मराज काडादी यांचा सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना (१९९.९४ कोटी), अहिल्यानगरमधील शरद पवार गटाचे राहुल जगताप यांचा कुकडी सहकारी साखर कारखाना (४९.८५ कोटी) आणि पुण्यातील शिरूरचे माजी आमदार शरद पवार गटाचे अशोक पवार यांच्या ताब्यातील घोडगंगा सहकारी साखर कारखाना (१८४.१२ कोटी) यांचे कर्ज नामंजूर केले आहे. छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज जाचक यांना याबाबत विचारले असता ते म्हणाले की, एनसीडीसीने काही त्रुटी काढल्या आहेत. त्या त्रुटींची पूर्तता करून पान ७ वर

## मंत्री महाजनांना महिलेने सुनावले व्हिडिओ व्हायरल! जाहीर पाणउतारा



**संसदेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्याने विरोधी पक्षांचा निषेध करण्यासाठी भाजपाने काल मुंबईत वरळी भागात आक्रोश मोर्चा काढला होता. या मोर्चात एका महिलेमुळेच मंत्री गिरीश महाजन यांच्यावर अपमानित होण्याचा प्रसंग ओढवला. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून अनेक जण महिलेचे समर्थन करत आहेत.**

■ मुंबई

**राज्य** भाजपाच्या वतीने जांबोरी मैदान ते वरळी डोमपर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चामुळे वरळी परिसरात वाहतूक जवळजवळ तासभर ठप्प झाली होती. त्यावेळी ही महिला आपल्या मुलाला शाळेतून आणण्यासाठी निघाली होती. मात्र वाहतूक थांबवल्याने रखडपट्टी झाली. त्यामुळे महिला संतप्त झाली. मोर्चाचे नेतृत्व करणारे जलसंपदा मंत्री महाजन यांच्यापर्यंत ती पोहोचली आणि तिने वाहतूक का अडवली याचा जाब महाजन यांनाच विचारला. तिच्या संतापामुळे तिचा आवाज चढला होता. महिलेचा रुद्रावतार पाहून महाजन गडबडून गेले. त्यांनी महिलेची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण ती काहीही ऐकून घेण्यास तयार नव्हती. ती म्हणत होती की, शेजारी मोकळे मैदान आहे तिथे जाऊन निदर्शने करा, इथे रस्ता का अडवून ठेवला आहे. इथून चालते व्हा, असे ती सरळ महाजनांना म्हणाली. तिला रोखू पाहणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावरही ती बरसली, तुम्ही गप्प बसा, आधी या लोकांना इथून हाकला आणि वाहतूक सुरळीत करा, माझ्या मुलाला मला आणायचे आहे, मी कुणाशीही बोलणार नाही, या मोर्चाला परवानगी का दिली, शेजारी मैदानात का जात नाही, असा दम तिने भरला.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. अनेक नेटकऱ्यांनी त्या महिलेची बाजू उचलून धरली आहे. काल घडलेल्या या घटनेबद्दल पान ७ वर

## थोडक्यात...

### मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे २३-२४ एप्रिलला बंद

**मुंबई -** यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग (मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे) वर गुरुवार २३ आणि २४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत वाहतूक तात्पुरती पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. डोंगरगाव-कुसगाव येथे

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



नव्याने बांधलेल्या पुलाचे शटरिंग काढणे आणि रंगकाम करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे काम सुरू असताना वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २३ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. या कालावधीत सर्व वाहने किवळे-देहूरोड-तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग ४८ वरून कुसगाव टोल प्लाझाकडे वळविण्यात येतील. तसेच, २४ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत पुण्याकडे येणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. सर्व वाहने कुसगाव टोल प्लाझा मार्गे राष्ट्रीय महामार्ग ४८ वरून देहूरोड-किवळे मार्गे पुण्याकडे वळवण्यात येतील.

### काँग्रेस मुख्यालयाबाहेर '१६' आकड्याचे पोस्टर

**नवी दिल्ली -** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लोकसभेतील १६ या आकड्याबाबत केलेल्या विधानानंतर देशभरात राजकीय चर्चेला सुरुवात झाली आहे. या १६ आकड्याचा नेमका अर्थ काय, याबाबत विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. अशातच आता दिल्लीतील




अकबर रोड येथील काँग्रेस मुख्यालय परिसरात भारतीय युवक काँग्रेसकडून एक मोठे पोस्टर लावण्यात आले आहे. या पोस्टरवर १६ हा आकडा ठळकपणे दारववण्यात आला असून, त्यासोबत प्रश्नचिन्ह आणि मॅजिक इज कॉम्प्रोमाईज असे वाक्य लिहिलेले दिसते. त्यामुळे या पोस्टरची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. सध्या काँग्रेस मुख्यालयाबाहेर लावलेल्या पोस्टरमुळे आणि त्यामागील संदेशामुळे राजकीय वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित होत असून, या १६ आकड्याचा अर्थ नेमका काय याबाबत उत्सुकता वाढली आहे.

## युद्धविरामाला मुदतवाढ! नाकेबंदी कायम
## अमेरिकेच्या भूमिकेवर इराणचा तीव्र आक्षेप

■ वॉशिंग्टन

**अमेरिका** आणि इराण दरम्यान होणार असलेल्या शांतता चर्चेची दुसरी फेरी रद्द झाल्यामुळे मध्य पूर्वेत शांतता प्रस्थापित होण्याच्या आशा मावळल्या आहेत. त्याचवेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेरच्या क्षणी युद्धविरामाची मुदत वाढवण्याची घोषणा करून काही प्रमाणात दिलासा दिला. मात्र युद्धविरामाच्या काळात अमेरिकन नौदलाकडून इराणची नाकेबंदी कायम राहील, असे ट्रम्प यांनी सांगितल्याने इराण संतापला आहे. तर दुसरीकडे होर्मुज खुली करण्यासाठी आता



फ्रान्स आणि ब्रिटन हे देश सक्रिय झाले आहेत.

अमेरिका आणि इराणने केलेल्या दोन आठवड्यांच्या युद्धबंदीची मुदत काल संपली. त्याच दिवशी पाकिस्तानच्या इस्लामाबाद येथे होणारी दुसऱ्या फेरीतील चर्चा रद्द झाली. त्यामुळे ट्रम्प यांनी आधी दिलेल्या धमकीनुसार अमेरिका इराणवर बॉम्बहल्ले करणार, असे वाटत असताना ट्रम्प यांनी काल अगदी शेवटच्या क्षणी युद्धविरामाला मुदतवाढ दिली. मात्र त्याचवेळी युद्धविरामाला मुदतवाढ दिली असली तरी इराणची नाकेबंदी सुरूच राहील, असे ट्रम्प यांनी सांगितले. पाकिस्तानच्या मध्यस्थीमुळे मुदतवाढ देत आहोत, असेही ट्रम्प यांनी सांगितले. पान ५ वर

## खरातच्या व्यवहाराशी संबंध नाही
## पत्नी कल्पनाचा न्यायालयात दावा

■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात नवे वळण आले आहे. खरातची पत्नी कल्पना खरात हिने पतीच्या व्यवहारांशी आपला कोणताही संबंध नसल्याचा दावा न्यायालयात केला आहे. कल्पना खरात ३१ मार्चपासून फरार असून, तिच्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज अहिल्यानगरमधील राहाता न्यायालयात सुनावणी पार पडली. सव्वा तास सुरू असलेल्या युक्तिवादानंतर कल्पना खरातचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने फेटाळला. सुनावणीदरम्यान तिचे वकील प्रशांत गिरी यांनी न्यायालयात युक्तिवाद करत कल्पना खरात हिचा कथित गैरप्रकारांशी कोणताही संबंध नसल्याचे सांगितले. कल्पना खरात यांच्या बँक खात्यांवरील व्यवहार त्यांच्या पतीकडूनच केले जात होते. त्यामुळे केवळ खात्यातून पैसे गेल्यामुळे त्यांना आरोपी ठरवणे योग्य नाही. तसेच, कोणत्याही आर्थिक व्यवहारात किंवा बैठकीत कल्पना खरात प्रत्यक्ष उपस्थित नव्हत्या, असा युक्तिवाद कल्पना खरात हिच्या पान ७ वर

## शेतकरी कर्जमाफीच्या संदर्भातील समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर

■ मुंबई

**राज्यातील** शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाबाबत महत्त्वाची हालचाल सुरू झाली असून, यासाठी स्थापन करण्यात आलेल्या प्रवीण परदेशी समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे या मुद्यावर पुढील निर्णय प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.

प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी नागपूर येथे महाएल्गार मोर्चा काढला होता. त्यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय उच्चाधिकार समिती गठीत केली होती. अर्थसंकल्पीय अधिवेशनात देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करत सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार समितीने आपला अहवाल सादर केला आहे. या समितीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून माहिती गोळा करून थकबाकीदार तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची यादी तयार केली. कर्जमाफीच्या अटी व शर्तींबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसून, २०१७ मधील कर्जमाफीप्रमाणेच अटी लागू होण्याची शक्यता आहे.

## पहलगाम हल्ल्यातील पर्यटकांना मोदींची श्रद्धांजली! देश दहशतवादासमोर झुकणार नाही

■ श्रीनगर

**काश्मीरमधील** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज वर्ष पूर्ण होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीडितांना श्रद्धांजली अर्पण केली. दुःखाच्या या प्रसंगी संपूर्ण भारत एकजुटीनं उभा असल्याचे सांगत देश दहशतवादासमोर कधीही झुकणार नाही, या आपल्या भूमिकेचा त्यांनी पुनरुच्चार केला.

पंतप्रधान मोदी यांनी एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटले, गेल्या वर्षी याच दिवशी पहलगाम येथे झालेल्या त्या भीषण दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या निष्पाप



व्यक्तींचे आज स्मरण करत आहे. त्यांना कधीही विसरले जाणार नाही. या दुःखाचा सामना करत असलेल्या पीडित कुटुंबांच्या वेदनांमध्ये मी देखील सहभागी आहे. माझ्या संवेदना त्यांच्यासोबत आहेत. एक राष्ट्र म्हणून, आम्ही या दुःखाच्या प्रसंगी एकजुटीनं उभे आहोत. भारत दहशतवादाच्या कोणत्याही स्वरूपासमोर कधीही झुकणार नाही. दहशतवाद्यांचे हे नीच आणि कुटील मनसुबे कधीही यशस्वी होणार नाहीत. भारताला दिल्या जाणाऱ्या कोणत्याही धोक्याचा सामना ताकदीने केला जाईल, असे पंतप्रधानांनी म्हटले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा पाठिंबा असलेल्या दहशतवाद्यांनी बैसारनच्या कुरणात २६ निष्पाप पर्यटकांची हत्या केली. हत्या करण्यापूर्वी त्यांचा धर्म जाणून घेतला होता.

## टीसीएस प्रकरणातील आरोपी एजाजचा जामीन अर्ज फेटाळला

■ नाशिक

**नाशिकमधील** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपी दानिश एजाजचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. फिर्यादी आणि आरोपी हे दोघेही एकाच कंपनीत काम करत असताना झालेल्या वादातून खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा युक्तिवाद आरोपींच्या वकिलांकडून करण्यात आला. मात्र सरकारी वकील ॲड. किरण बेंडभर यांनी जोरदार युक्तिवाद करत आरोपींना जामीन देऊ नये अशी बाजू मांडली. त्यानंतर न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला. दरम्यान, या प्रकरणातील इतर सहा संशयित आरोपींनीही जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. दानिश शेख, आसिफ अन्सारी, तौसिफ अत्तार, शाहरुख कुरेशी, रजा मेमन आणि शफी शेख या आरोपींच्या जामीन अर्जावर २ मे रोजी सुनावणी होणार आहे.

## मतदार यादी तपासणी सुरू होत आहे
## आधार, पॅन तयार ठेवा | झीनत यांची मुलाखत

**भारतीय निवडणूक आयोग महाराष्ट्रातील मतदार याद्यांची विशेष सखोल पुनर्तपासणी (एसआयआर) जाहीर झाली आहे. १४ एप्रिलपासून ही प्रक्रिया सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई युवक काँग्रेसतर्फे ही प्रक्रिया समजून सांगण्यासाठी कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळा सुरू केल्या आहेत. कार्यकर्त्यांना मतदार यादी पडताळणी, नोंदणी व दुरुस्ती प्रक्रियेचे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रक्रियेत अल्पसंख्याक आणि दलित समाजावर अन्याय होऊ शकतो या चिंतेमुळेच प्रशिक्षणाचा उपक्रम राबवण्यात येत असल्याची माहिती मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांनी 'नवाकाळ'ला दिलेल्या मुलाखतीत दिली.**

- वेदिका मांगेला

**युवक काँग्रेसने हे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यामागची भूमिका काय आहे?**

**झीनत शबरीन-** मुंबई प्रदेश युवक काँग्रेसतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश सर्व पदाधिकाऱ्यांना एसआयआर प्रक्रियेची सविस्तर माहिती देणे हा होता. १४ एप्रिलपासून ही प्रक्रिया सुरू झाली आहे. सध्या पूर्ण क्षमतेने कामकाज सुरू नसले तरी प्रत्येकाला या प्रक्रियेची माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. हा उपक्रमाचा पहिला टप्पा असून पुढील टप्प्यात मुंबईतील विविध भागांत, विशेषतः अल्पसंख्याक, दलित आणि आदिवासी समाजाचे प्रमाण अधिक असलेल्या परिसरात एसआयआर हेल्प डेस्क सुरू करण्यात येणार आहेत. मुंबईतील सर्व ३६ विधानसभा मतदारसंघांमध्ये हे हेल्प डेस्क कार्यरत राहतील.



**एसआयआरची प्रक्रिया कशी असणार आहे?**

**झीनत शबरीन -** एसआयआर प्रक्रियेत मुख्यतः दोन महत्त्वाचे टप्पे असतात. पहिला टप्पा म्हणजे ओळख पडताळणी, ज्यामध्ये संबंधित व्यक्ती खरोखर मतदार आहे की नाही, हे निश्चित केले जाते. दुसरा टप्पा म्हणजे आवश्यक फॉर्म भरून संबंधित व्यक्तीची संपूर्ण माहिती अधिकृतपणे नोंदली जाते. सध्या शासनाने eci.net ॲपच्या माध्यमातून यासाठी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या ॲपद्वारे मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती, नाव वगळणे, विविध तक्रारींचे निराकरण अशा पान ७ वर

## नेपाळचे पंतप्रधान बालेन शहांविरोधात काही आठवड्यांतच विद्यार्थी आंदोलन

■ काठमांडू

**विद्यार्थी** आंदोलनातून सत्तांतर होऊन नेपाळचे पंतप्रधान बनलेले बालेन शहा यांनी पदभार स्वीकारल्यानंतर काही आठवड्यांतच त्यांना विद्यार्थी आंदोलनांचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थी संघटनांवर घातलेली बंदी, भारतातून येणाऱ्या वस्तूंवर लावलेले सीमाशुल्क आणि कथित आर्थिक गैरव्यवहारांप्रकरणी गृहमंत्री सुदान गुरूंग यांच्या राजीनाम्याची वाढती मागणी यामुळे नेपाळमध्ये पुन्हा असंतोष



निर्माण झाला आहे. या आंदोलनांतर गृहमंत्री सुदान गुरूंग यांनी राजीनामा दिला.

दोन-तृतीयांश बहुमतासह नवे सरकार सत्तेवर आल्यानंतर महिन्याभरातच ही परिस्थिती निर्माण झाली आहे. रस्त्यांपासून देशाच्या प्रशासकीय केंद्र असलेल्या सिंग्हा दरबारपर्यंत आंदोलन होत आहेत. विद्यार्थी, राजकीय गट व सामान्य नागरिक काठमांडू तसेच इतर शहरांत रस्त्यावर उतरले. या आंदोलनामागील एक प्रमुख कारण भारतातून १०० रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या वस्तूंवर बंधनकारक सीमाशुल्क लावण्याचा सरकारचा निर्णय आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार- (30,000-90,000) **9820628009** {NC260149}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार + जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर : **9819426634/ 9969529162** {NC260193}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी टेक्निशियन पाहिजेत पगार 18000/- कांदिवली पश्चिमः **9769723507** {NC260255}

कल्याण येथे गव्हर्नमेंट लायसन इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर साठी इंजिनिअर, सुपरवाइजर, हेल्पर्स पाहिजेत. संपर्क **8080619999** {NC260282}

बुक बाईंडर पाहिजे, सेंटर पिनिंग, परफेक्ट बाईंडिंग, हार्ड बाईंडिंग कामाचे अनुभवी उमेदवार हवा Alpha Digital Prints, दहिसर, पगार 20,000 पर्यंत. संपर्कः **9869483826** {NC260277}

अनुभवी स्क्रीन प्रिंटर, हेल्पर आणि डिलिव्हरी बॉयची नाहूर येथे आवश्यकता आहे. संपर्क: **7506632363** {NC260274}

बिस्लेरी बॉटलच्या डिलीव्हरीसाठी मुले पाहिजेत. दादर, प्रभादेवी. संपर्कः **9892307267/ 7666255660** {NC260290}

आश्रममध्ये कामासाठी स्त्री/ पुरुष पाहिजे. राहणे-खाणे फ्री, पगार 10000/- 20000/- . पनवेल- **9167555200** {NC260158}

पुणे शहरात मध्यवर्ती ठिकाणी टू कलर फोर कलर प्रिंटिंग मशीन वर बॉयलर फिडरमन हेल्पर पाहिजे आहेत संपर्क **9822352233** {NC260243}

## पाहिजेत

सुरक्षा गार्ड भरती मुंबई सॅलरी 18-25 रहाणे खाणे फ्री **9925736285** {NC260188}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार 12000+ गाडीभाडे+ कमिशन **8356824867** {NC260245}

ऑफसेट प्रिंटिंग मशीनवर प्रिंटर, फिडरमेन, बॉलर पाहिजेत. गोरेगाव (ईस्ट). **9820039302.** {NC260194}

मुंबईतील नामांकीत हॉटेलसाठी हेल्पर, वेटर, पाणी कपडा, कामगार पाहिजेत, PF, ESIC, राहण्याची सुविधा उपलब्ध. **9892378151, 9769565469** {NC260296}

FLAG SECURITY सिक्युरीटीगार्डस 30,000/-+ 4 सुट्टी PF/ESIC (12 तास) वरळीकरीता. 307, माहीम इंडस्ट्रीयल इस्टेट, खिलनानी हायस्कूल, माहीम वेस्ट. फोन- **9920316000** {NC260293}

ऑफसेट प्रिंटर आवश्यकता आहे- मल्टीलिथ ११x१७ आणि टू-कलर १५x१८ नॉनवोव्हन बॅग मशीनसाठी- भायखळा (पूर्व)- **9869081515** {NC260298}

कुरीअर कंपनीमध्ये पिकअप व डिलीव्हरी साठी त्वरीत मुले पाहिजेत ठिकाण- फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवी मुंबई दररोज रोख ६००/- + प्रवास खर्च Speedman Express 191-B, 9th Cavel Cross lane, 1st floor, Dr. viegas street, Near Barretto high School, Chirabazar, Mumbai- 400002. Note- फोन न करता ऑफीसमध्ये येणे. {NCC260009}

मिठाईच्या दुकानात हाऊसकीपिंगसाठी अनुभवी मुलगा पाहिजे, 9 तास 13200- बोरीवली, माटुंगा, घाटकोपर, **9699927271** {NC260299}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260031}

## वधू वर मेळावा

हेमांगी वधू-वर मेळावा दिनांक २६/४/२०२६ ५००/- नोंदणी फी+ स्वतःचा बायोडाटा आणावा. समाजाची + शिक्षणाची आणि वयाची अट नाही. वेळ १० ते ४ पर्यंत. ठिकाण- शारदा मंदिर संस्था, लाल चौकी, कल्याण (प), जि.ठाणे. संपर्क- आदित्य मोडक- **9619238732** {NC260006}


## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. **- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# वाडा तालुक्यात फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट

## दोन कामगारांचा मृत्यू चारजण गंभीर जखमी

■ पालघर

**जिल्ह्यातील** वाडा तालुक्यातील कोणसई येथे अनधिकृतपणे सुरू असलेल्या एका फटाक्याच्या कारखान्यात काल मंगळवारी भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत दोन कामगारांचा मृत्यू झाला. तर चार कामगार गंभीर जखमी झाले. या भीषण स्फोटात मृत्युमुखी पडलेल्या दोन कामगारांची नावे भावेश दिलीप चावरे (२५) आणि मोनिका सचिन पडवळे (३०) असून ते पालसई येथे राहत होते. जखमींमध्ये मोनिका जाधव, जयश्री रावते, अर्चना मिसाळ आणि प्रतिभा पवार यांचा समावेश



असून, त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

या कारखान्यात एकूण सुमारे ३५ कामगार काम करत होते. या स्फोटाची तीव्रता इतकी जबरदस्त होती की, परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. कोणसई परिसरात हा कारखाना अनधिकृतपणे सुरू होता. या कारखान्यात सुतळी बॉम्ब, त्याचप्रमाणे इतर फटाक्यांचे उत्पादन होत होते. वाडा तालुक्यात अशा बेकायदेशीर कारखान्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे कामगारांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे.

# आयुष कोमकर हत्या प्रकरण लक्ष्मी आंदेकरचा जामीन फेटाळला

■ पुणे

**आयुष** कोमकर हत्या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या नगरसेविका लक्ष्मी आंदेकर हिचा जामीन अर्ज पुणे सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. या प्रकरणातील गंभीर आरोप आणि तपासातील पुरावे लक्षात घेऊन न्यायालयाने हा निर्णय दिला.

माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खून प्रकरणानंतर आयुष कोमकर याची हत्या झाल्याचा आरोप असून, हा प्रकार बदला घेण्याच्या उद्देशाने घडवून आणल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. या प्रकरणात लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. पोलीस तपासानुसार, टोळीप्रमुख बंडू आंदेकर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी आयुष कोमकरच्या खुनाचा कट रचल्याची माहिती आहे.

# एकाच दिवसात ३ तरुणांच्या आत्महत्या

**भाईंदर** - मीरा-भाईंदर शहरात मंगळवारी एका दिवसात तीन तरुणांनी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. यापैकी दोन तरुणांनी गळफास घेऊन तर एका तरुणाने उंच इमारतीवरून उडी मारून आपले जीवन संपवले आहे. तिन्ही आत्महत्या मंगळवारी शहरातील वेगवेगळ्या भागात घडल्या. विकास कुमार बिंद (२१) हा भाईंदर येथील गणेश देवल नगरात राहत होता. त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. दीपक शर्मा (२१) या तरुणाने काशीगाव येथील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. मीरा रोडच्या जितेश परिहार याने राहत्या इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केली.

# विरारच्या विजयवल्लभ रुग्णालय जळीतकांडाला ५ वर्षे पूर्ण

## दोषींवर अद्याप कारवाई नाही

■ विरार

**विरारमधील** विजयवल्लभ रुग्णालयाला लागलेल्या आगीला २३ एप्रिल रोजी ५ वर्षे पूर्ण झाली. या आगीत १७ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला होता. या आगीसाठी दोषी अधिकाऱ्यांवर कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही.

२३ एप्रिल २०२१ रोजी विरारच्या विजय वल्लभ रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात आग लागली होती. या आगीत १७ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला होता. या दुर्घटनेची पालघर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने चौकशी करून अहवाल राज्य शासनास सादर केला होता. या आगीसाठी रुग्णालय व्यवस्थापन तसेच वसई-विरार महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन), अतिरिक्त आयुक्त (वैद्यकीय आरोग्य व विद्युत) ,आरोग्य, विद्युत आणि अग्निशमन विभागाचे उपायुक्त तसेच अग्निशमन अधिकारी दिलीप पालव जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढला होता.

# कोल्हापुरात उदगावच्या जामा मस्जिद ट्रस्टची निवडणूक स्थगित

## जिल्हा वक्फ बोर्डाचा आदेश

■ कोल्हापूर

शिरोळ तालुक्यातील उदगाव येथील सुन्नत जमातुल मुस्लिमीन जामा मस्जिद ट्रस्टच्या व्यवस्थापन समितीची आज बुधवारी होणारी पंचवार्षिक निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. ही निवडणूक बेकायदेशीरपणे होत असल्याची तक्रार जिल्हा वक्फ अधिकारी यांच्याकडे मतदानाचा हक्क डावललेल्या सभासदांनी केली होती. या पार्श्वभूमीवर या निवडणुकीला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

जामा मस्जिद उदगाव ट्रस्टची ११ व्यवस्थापन समिती निवड करण्यासाठी ९ मार्चला पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता. त्यानुसार आज बुधवारी मतदान होणार होते. २९७ सभासद वगळता इतर ५०० ते ६०० सभासदांनी मागील वर्षाची वार्षिक वर्गणी न भरल्याचे कारण दाखवून त्यांच्या मतदानाचा अधिकार हिरावून घेत ही निवडणूक घेतली जाणार होती. त्यामुळे ही निवडणूक रद्द करावी अशी मागणी करण्यात आली होती.या तक्रारीनंतर या जामा मस्जिद संदर्भात वक्फ संस्थेची योजना मंजूरीचे आदेश तसेच निवडणूक कोणाच्या आदेशाने घेण्यात येत आहे, याबाबतचा खुलासा करावा व बुधवारी होणारी निवडणूक तात्पुरती थांबविण्याचा आदेश जिल्हा वक्फ अधिकारी यांनी दिला.

# रितेश-जेनेलिया देशमुख एसटीचे ब्रॅण्ड ॲम्बेसिडर

■ मुंबई

**माजी** मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे पुत्र व अभिनेते रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी)च्या 'रस्ता सुरक्षा अभियान'साठी पुढील पाच वर्षांसाठी ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



या नियुक्तीचा करार हस्तांतरण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी रितेश देशमुख उपस्थित होते. याबाबत रितेश देशमुख म्हणाले की, माझी आणि जेनेलियाची एसटीच्या ब्रँड ॲम्बेसिडरपदी नियुक्ती केल्याबद्दल मी प्रताप सरनाईक यांचा आभारी आहे. लहानपणी मी वडिलांसोबत एसटीने प्रवास केला आहे. एसटी माझ्या आयुष्याचा एक भाग राहिली. त्यामुळे ही जबाबदारी मिळाल्याचा अभिमान आहे. आम्ही दोघेही या मोहिमेसाठी पूर्ण सहकार्य करू.

# माजी मंत्री डॉ.भागवत कराडांच्या मुलाची स्वीकृत सदस्यपदी निवड

■ छत्रपती संभाजीनगर

**माजी** केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आणि भाजपाचे नेते डॉ. भागवत कराड यांचे चिरंजीव हर्षवर्धन कराड यांची छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्वीकृत सदस्य (नगरसेवक) पदावर निवड करण्यात आली आहे. भाजपाने या महापालिकेसाठी आपल्या स्वीकृत नगरसेवकांची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये हर्षवर्धन कराड यांच्यासह इतर चार जणांची वर्णी लागली आहे.

भाजपाने आपल्या पक्षातर्फे हर्षवर्धन कराड यांच्यासह गोकुळ मलके, विजयसिंग झाला, छायाताई खाजेकर आणि अमृताताई पालोदकर यांची नावे स्वीकृत सदस्य म्हणून जाहीर केली आहेत. हर्षवर्धन कराड हे माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ.भागवत कराड यांचे सुपुत्र आहेत. पालिका निवडणुकीतच आपल्या मुलाला उमेदवारी मिळावी अशी भागवत कराड यांची इच्छा होती, परंतु भाजपाच्या नातेवाईकांना उमेदवारी न देण्याच्या धोरणामुळे त्यांना थेट निवडणूक लढवता आली नव्हती.

# विनापरवानगी गैरहजर राहणे महिला कर्मचाऱ्याला भोवले

■ मुंबई

**विनापरवानगी** कामावर गैरहजर राहणे एका महिला कर्मचाऱ्याला चांगलेच महागात पडले. विनापरवानगी प्रदीर्घ काळ कामावर गैरहजर राहणे, हा गंभीर गैरप्रकार आहे, असे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने कर्मचारी महिलेच्या सेवामुक्तीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. नॅशनल इन्शुरन्स कंपनीतील वरिष्ठ सहाय्यक महिलेने सेवामुक्तीच्या निर्णयाविरोधात दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावली.

नेहा सावंत या नॅशनल इन्शुरन्स कंपनीत वरिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत होत्या. कंपनीच्या म्हणण्यानुसार, त्या २२ एप्रिल २०१४ पासून सलग गैरहजर होत्या. या कालावधीत त्यांनी रजेचा कोणताही अर्ज दिला नव्हता किंवा वरिष्ठांना कळवले नव्हते. कंपनीने वेळोवेळी स्मरणपत्रे पाठवूनही कामावर रुजू झाल्या नाहीत. अखेर ९९३ दिवसांच्या अनधिकृत रजेनंतर कंपनीने त्यांच्यावर विभागीय चौकशी बसवून १० जानेवारी २०१८ रोजी सेवेतून काढून टाकण्याचे आदेश दिले होते.

# जूनपर्यंत ठाणे शहरात वाहने धुण्यावर निर्बंध

## महापौरांसह आयुक्तांचे पाणी बचतीचे आवाहन



■ ठाणे

**वाढत्या** तापमानामुळे पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाई शक्यतेच्या पार्श्वभूमीवर महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि आयुक्त सौरभ राव यांनी शहरातील सर्व सेंटरमध्ये १० जूनपर्यंत सर्व प्रकारची वाहने धुण्यावर निर्बंध लादले आहेत. या आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. ठाणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा तीव्र उन्हामुळे झपाट्याने कमी होत चालला आहे.

तसेच शहरातील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळीही खालावली आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केले आहे. पाणी बचतीसाठी प्रभावी उपाययोजना म्हणून सर्व्हिस सेंटरमध्ये दोन, तीन व चार चाकी वाहनांसह इतर वाहनांचे धुणे आणि साफसफाई तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

# सुपर १०० उपक्रमासाठी १० हजारांहून अधिक अर्ज

■ नाशिक

**नाशिक** जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या सुपर १०० उपक्रमासाठी नोंदणी प्रक्रिया आता पूर्ण झाली असून, विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. सुपर १०० उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील गुणी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आणि नीटसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मोफत निवासी सुविधा, भोजन व तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमासाठी एकूण १०,३०५ अर्ज प्राप्त झाले आहेत. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रशांत दिग्रस्कर यांच्या मार्गदर्शनानुसार गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रभावी जनजागृती मोहीम राबवली. ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला गेला.

# आजचे राशी भविष्य



गुरुवार ता. २३ एप्रिल २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | उत्साहाने कामे पार पाडाल. दिवस उत्पादक राहील. नवीन कार्यारंभ फायद्याचा ठरेल. |
| वृषभ | भविष्याबाबत काही चांगल्या योजना आखता येतील. लोकसंपर्कासाठी दिवस चांगला. अतिभावनिकता टाळा. |
| मिथुन | वेळा पाळणे महत्त्वाचे राहील. किरकोळ कारणाने निराश होऊ नका. सहकाऱ्यांशी कामापुरते बोला. |
| कर्क | स्वत:साठी वेळ काढा. महत्त्वाचे निर्णय आज नकोत. फसव्या गुंतवणूक योजनांपासून दूर राहा. |
| सिंह | छान दिवस आहे. अनेक चांगले प्रस्ताव येतील. योग्य निर्णय घेता येतील. |
| कन्या | कामात व्यस्त ठेवणारा दिवस आहे. कामात लक्ष एकाग्र करणे महत्त्वाचे राहील. संयम बाळगा. |
| तूळ | महत्त्वाचे निर्णय आज नकोत. काटेकोर नियोजन हिताचे ठरेल. पैशाची चणचण जाणवेल. |
| वृश्चिक | ताण न घेता दिवस व्यतीत करा. संततीच्या प्रगतीबाबत चिंता संभवते. जोडीदाराशी वाद टाळा. |
| धनु | आश्वासक दिवस आहे. महत्त्वाचे निर्णय घेण्यास अनुकूलता राहील. सर्वत्र कामाची वाखाणणी होईल. |
| मकर | लोकसंपर्कासाठी चांगला दिवस. नियोजनपूर्वक कामे करा. कामाचा ताण घेऊ नका. |
| कुंभ | जबाबदाऱ्या वाढतील. मात्र ताण घेऊ नका. महत्त्वाचे निर्णय आज नकोत. |
| मीन | महत्त्वाची कामे लांबणीवर टाकणे योग्य ठरेल. महत्त्वाचे निर्णयही आज नकोत. कोणत्याही परिस्थितीत आशा सोडू नका. |

# शुभ राशी ता.२३/४/२०२६

| | | |
|---|---|---|
| २ | ४ | ९ |
| २१ | ४३ | ९३ |
| २६ | ४८ | ९८ |
| २४६ | १४९ | १२६ |
| ५७० | ३५६ | ३६० |

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 16 | सोडत दिनांक 22/04/2026

| बक्षिस | निकाल |
|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AK-02 : 5573 |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 5573 — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3903 — महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (2 बक्षिसे) |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 4208 | 6531 | 7265 | 7794 | 8412 | 8564 | 8811 | 8828 | 9205 | 9567 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1409 | 2447 | 2646 | 4126 | 4424 | 5304 | 7136 | 7751 | 8196 | 8215 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2242 | 3014 | 3560 | 5075 | 5390 | 5425 | 7308 | 8753 | 9001 | 9492 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0088 | 1759 | 3351 | 3969 | 6395 | 6562 | 8441 | 9338 | 9593 | 9662 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1239 | 2039 | 2982 | 3617 | 4341 | 4936 | 5645 | 6266 | 6980 | 7777 | 8481 | 9188 |
| | | 1254 | 2072 | 2986 | 3619 | 4358 | 4943 | 5672 | 6267 | 6989 | 7782 | 8483 | 9212 |
| | | 1306 | 2079 | 3030 | 3632 | 4364 | 4991 | 5675 | 6278 | 6990 | 7827 | 8493 | 9259 |
| | | 1310 | 2089 | 3095 | 3660 | 4365 | 4997 | 5681 | 6296 | 7003 | 7891 | 8570 | 9262 |
| | | 1334 | 2095 | 3131 | 3673 | 4404 | 5045 | 5735 | 6313 | 7017 | 7896 | 8580 | 9302 |
| 0008 | 0649 | 1352 | 2125 | 3136 | 3674 | 4410 | 5050 | 5738 | 6333 | 7076 | 7927 | 8591 | 9323 |
| 0034 | 0703 | 1401 | 2126 | 3163 | 3683 | 4423 | 5055 | 5752 | 6399 | 7079 | 7936 | 8618 | 9373 |
| 0045 | 0708 | 1409 | 2154 | 3178 | 3684 | 4434 | 5065 | 5759 | 6446 | 7093 | 7954 | 8628 | 9379 |
| 0066 | 0710 | 1441 | 2155 | 3183 | 3702 | 4441 | 5067 | 5771 | 6470 | 7094 | 7977 | 8638 | 9388 |
| 0078 | 0714 | 1455 | 2157 | 3196 | 3705 | 4444 | 5105 | 5798 | 6479 | 7116 | 7983 | 8639 | 9430 |
| 0109 | 0729 | 1456 | 2200 | 3213 | 3713 | 4449 | 5127 | 5803 | 6501 | 7117 | 8008 | 8659 | 9462 |
| 0139 | 0741 | 1473 | 2203 | 3220 | 3732 | 4450 | 5143 | 5807 | 6532 | 7141 | 8013 | 8668 | 9491 |
| 0196 | 0789 | 1487 | 2227 | 3225 | 3738 | 4455 | 5157 | 5845 | 6564 | 7177 | 8028 | 8701 | 9493 |
| 0197 | 0799 | 1508 | 2247 | 3231 | 3793 | 4460 | 5196 | 5850 | 6589 | 7179 | 8039 | 8736 | 9497 |
| 0222 | 0800 | 1546 | 2259 | 3237 | 3803 | 4480 | 5206 | 5885 | 6590 | 7193 | 8063 | 8755 | 9565 |
| 0234 | 0840 | 1567 | 2262 | 3245 | 3822 | 4483 | 5207 | 5891 | 6594 | 7206 | 8086 | 8788 | 9599 |
| 0264 | 0858 | 1579 | 2268 | 3273 | 3830 | 4493 | 5238 | 5894 | 6623 | 7230 | 8088 | 8801 | 9633 |
| 0273 | 0881 | 1613 | 2285 | 3275 | 3878 | 4524 | 5255 | 5900 | 6643 | 7278 | 8098 | 8810 | 9664 |
| 0280 | 0903 | 1619 | 2325 | 3298 | 3922 | 4527 | 5264 | 5943 | 6646 | 7283 | 8099 | 8817 | 9690 |
| 0306 | 0906 | 1641 | 2392 | 3307 | 4011 | 4536 | 5266 | 5953 | 6667 | 7292 | 8127 | 8818 | 9696 |
| 0324 | 0934 | 1658 | 2422 | 3308 | 4038 | 4583 | 5285 | 5963 | 6669 | 7328 | 8164 | 8826 | 9699 |
| 0354 | 1035 | 1688 | 2424 | 3332 | 4043 | 4584 | 5307 | 5979 | 6694 | 7339 | 8178 | 8838 | 9704 |
| 0370 | 1052 | 1691 | 2426 | 3356 | 4050 | 4586 | 5350 | 5994 | 6695 | 7376 | 8179 | 8840 | 9717 |
| 0383 | 1081 | 1751 | 2451 | 3357 | 4060 | 4606 | 5357 | 6014 | 6696 | 7415 | 8180 | 8848 | 9728 |
| 0384 | 1097 | 1777 | 2464 | 3363 | 4067 | 4623 | 5396 | 6033 | 6697 | 7446 | 8181 | 8860 | 9772 |
| 0390 | 1101 | 1811 | 2478 | 3369 | 4071 | 4646 | 5404 | 6067 | 6698 | 7472 | 8200 | 8872 | 9780 |
| 0400 | 1114 | 1817 | 2619 | 3415 | 4094 | 4705 | 5418 | 6073 | 6713 | 7506 | 8258 | 8926 | 9799 |
| 0409 | 1126 | 1825 | 2652 | 3430 | 4100 | 4708 | 5441 | 6107 | 6716 | 7566 | 8278 | 8958 | 9830 |
| 0420 | 1139 | 1833 | 2692 | 3433 | 4178 | 4730 | 5478 | 6108 | 6748 | 7570 | 8328 | 8969 | 9840 |
| 0451 | 1143 | 1839 | 2714 | 3434 | 4184 | 4732 | 5506 | 6120 | 6752 | 7647 | 8338 | 8984 | 9849 |
| 0493 | 1151 | 1890 | 2746 | 3436 | 4193 | 4743 | 5508 | 6159 | 6765 | 7676 | 8360 | 9024 | 9910 |
| 0505 | 1158 | 1918 | 2791 | 3437 | 4199 | 4750 | 5512 | 6163 | 6787 | 7681 | 8376 | 9029 | 9912 |
| 0538 | 1160 | 1921 | 2793 | 3444 | 4205 | 4764 | 5517 | 6176 | 6793 | 7685 | 8378 | 9036 | 9923 |
| 0551 | 1167 | 1922 | 2801 | 3447 | 4208 | 4819 | 5524 | 6191 | 6803 | 7711 | 8383 | 9052 | 9934 |
| 0569 | 1172 | 1944 | 2811 | 3480 | 4220 | 4878 | 5528 | 6195 | 6807 | 7728 | 8386 | 9055 | 9959 |
| 0607 | 1176 | 1949 | 2831 | 3486 | 4227 | 4879 | 5584 | 6223 | 6821 | 7739 | 8445 | 9060 | 9970 |
| 0620 | 1179 | 1991 | 2832 | 3493 | 4244 | 4881 | 5594 | 6243 | 6829 | 7745 | 8449 | 9067 | 9979 |
| 0626 | 1182 | 2020 | 2844 | 3509 | 4246 | 4893 | 5597 | 6244 | 6841 | 7750 | 8453 | 9096 | 9989 |
| 0642 | 1210 | 2022 | 2940 | 3518 | 4304 | 4919 | 5601 | 6247 | 6887 | 7760 | 8468 | 9117 | 9993 |
| 0646 | 1225 | 2028 | 2944 | 3571 | 4308 | 4927 | 5628 | 6258 | 6952 | 7771 | 8470 | 9145 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल - गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 16 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 22/04/2026

| बक्षिस | निकाल |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-05 : 5086 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 6237 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3659 — महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर |

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1230 | 2354 | 3554 | 3618 | 4173 | 5556 | 6245 | 6672 | 9095 | 9909 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0071 | 1578 | 1907 | 2388 | 4347 | 5716 | 6140 | 7332 | 7581 | 9704 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0929 | 1175 | 1879 | 2307 | 2914 | 2949 | 5516 | 6398 | 6511 | 9537 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1220 | 2294 | 3135 | 4464 | 5395 | 6356 | 7355 | 8348 | 9008 |
| | | 1400 | 2310 | 3136 | 4561 | 5467 | 6362 | 7489 | 8357 | 9139 |
| | | 1451 | 2312 | 3149 | 4584 | 5472 | 6505 | 7538 | 8385 | 9152 |
| 0008 | 0575 | 1523 | 2315 | 3236 | 4625 | 5573 | 6529 | 7590 | 8424 | 9243 |
| 0026 | 0609 | 1527 | 2441 | 3310 | 4629 | 5575 | 6602 | 7627 | 8442 | 9291 |
| 0039 | 0627 | 1621 | 2452 | 3430 | 4822 | 5583 | 6622 | 7687 | 8526 | 9306 |
| 0072 | 0656 | 1653 | 2465 | 3608 | 4843 | 5608 | 6644 | 7700 | 8538 | 9309 |
| 0075 | 0676 | 1713 | 2470 | 3632 | 4924 | 5764 | 6649 | 7704 | 8564 | 9325 |
| 0078 | 0703 | 1715 | 2512 | 3674 | 4928 | 5815 | 6679 | 7737 | 8589 | 9361 |
| 0096 | 0718 | 1820 | 2534 | 3733 | 4938 | 5832 | 6735 | 7766 | 8605 | 9377 |
| 0102 | 0839 | 1830 | 2683 | 3771 | 4962 | 5853 | 6740 | 7781 | 8611 | 9407 |
| 0152 | 0859 | 1846 | 2748 | 3856 | 5095 | 5885 | 6776 | 7792 | 8771 | 9489 |
| 0188 | 0882 | 1896 | 2862 | 3858 | 5111 | 5893 | 6831 | 7828 | 8780 | 9559 |
| 0200 | 0914 | 2012 | 2923 | 3933 | 5149 | 5948 | 6843 | 7846 | 8787 | 9646 |
| 0204 | 0960 | 2100 | 2929 | 4111 | 5212 | 6006 | 6852 | 7895 | 8795 | 9720 |
| 0290 | 1000 | 2129 | 3030 | 4118 | 5252 | 6015 | 6864 | 7978 | 8839 | 9759 |
| 0301 | 1015 | 2153 | 3041 | 4119 | 5256 | 6020 | 6986 | 8158 | 8849 | 9829 |
| 0321 | 1100 | 2208 | 3083 | 4143 | 5259 | 6070 | 7017 | 8178 | 8918 | 9889 |
| 0452 | 1147 | 2250 | 3090 | 4154 | 5267 | 6076 | 7195 | 8187 | 8962 | 9900 |
| 0465 | 1182 | 2269 | 3093 | 4241 | 5382 | 6199 | 7227 | 8243 | 8965 | 9949 |
| 0484 | 1196 | 2292 | 3120 | 4257 | 5383 | 6263 | 7308 | 8283 | 8984 | 9969 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल - महाराष्ट्र सह्याद्री (विजयालक्ष्मी विकली लॉटरी)

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 16 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 22/04/2026

| बक्षिस | निकाल |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SV-06 : 2010 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0575 | 0921 | 2277 | 4252 | 4405 | 4933 | 5985 | 7172 | 7372 | 7815 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0078 | 0129 | 0338 | 0745 | 0746 | 2601 | 6336 | 7786 | 8730 | 9299 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0172 | 1148 | 1296 | 1956 | 2837 | 3245 | 3680 | 6592 | 8875 | 9544 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1136 | 1681 | 2651 | 3840 | 5035 | 6610 | 7255 | 8883 |
| | 1159 | 1701 | 2692 | 3913 | 5036 | 6637 | 7468 | 8885 |
| 0017 | 1165 | 1871 | 2772 | 3940 | 5335 | 6649 | 7761 | 8898 |
| 0362 | 1189 | 1990 | 2809 | 3979 | 5457 | 6660 | 7766 | 8984 |
| 0530 | 1197 | 2053 | 2869 | 3980 | 5561 | 6662 | 8194 | 9119 |
| 0532 | 1253 | 2192 | 3349 | 4241 | 5834 | 6709 | 8227 | 9143 |
| 0732 | 1315 | 2194 | 3353 | 4296 | 5924 | 6716 | 8239 | 9147 |
| 0770 | 1370 | 2223 | 3545 | 4340 | 5937 | 6766 | 8245 | 9232 |
| 0793 | 1496 | 2297 | 3583 | 4485 | 6005 | 6804 | 8369 | 9294 |
| 0846 | 1514 | 2332 | 3673 | 4487 | 6161 | 6956 | 8555 | 9319 |
| 0911 | 1609 | 2362 | 3709 | 4641 | 6169 | 6992 | 8572 | 9509 |
| 1011 | 1646 | 2379 | 3743 | 4748 | 6206 | 7028 | 8659 | 9708 |
| 1122 | 1651 | 2588 | 3783 | 4769 | 6483 | 7178 | 8860 | 9739 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल - महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 16 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 22/04/2026

| बक्षिस | निकाल |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-00 : 3055 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1685 | 2178 | 6263 (महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी) | 6647 (अंबिका एजन्सी, दादर, मुंबई) | 6785 (रॉयल एजन्सी, आंकली) | 7144 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 7593 (सुमित एजन्सी, मुंबई) | 7661 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 9212 | 9887 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0050 | 2026 | 2751 | 3612 | 4031 | 5512 | 6298 | 8092 | 8359 | 9455 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0940 | 1736 | 1947 | 2116 | 4507 | 5410 | 6629 | 7346 | 7481 | 8875 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0626 | 2721 | 3177 | 4201 | 6202 | 6817 | 7800 | 9481 | 9563 | 9670 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1418 | 2266 | 3143 | 3833 | 5056 | 5927 | 6685 | 7378 | 8078 | 9211 |
| | | 1511 | 2282 | 3191 | 3842 | 5077 | 5945 | 6698 | 7391 | 8133 | 9233 |
| 0030 | 0702 | 1513 | 2292 | 3195 | 4056 | 5079 | 5955 | 6806 | 7416 | 8135 | 9267 |
| 0045 | 0706 | 1514 | 2323 | 3278 | 4061 | 5110 | 5991 | 6850 | 7422 | 8188 | 9332 |
| 0053 | 0771 | 1538 | 2328 | 3289 | 4075 | 5167 | 6073 | 6867 | 7483 | 8357 | 9364 |
| 0084 | 0792 | 1571 | 2353 | 3304 | 4222 | 5303 | 6136 | 6874 | 7562 | 8378 | 9386 |
| 0095 | 0795 | 1701 | 2390 | 3306 | 4286 | 5314 | 6169 | 6931 | 7582 | 8421 | 9392 |
| 0176 | 0811 | 1712 | 2420 | 3335 | 4303 | 5442 | 6203 | 6993 | 7587 | 8456 | 9399 |
| 0240 | 0919 | 1773 | 2488 | 3356 | 4309 | 5458 | 6362 | 7078 | 7589 | 8517 | 9428 |
| 0276 | 1047 | 1811 | 2592 | 3361 | 4344 | 5459 | 6377 | 7084 | 7607 | 8535 | 9489 |
| 0299 | 1055 | 1847 | 2646 | 3386 | 4347 | 5493 | 6410 | 7087 | 7622 | 8585 | 9492 |
| 0312 | 1078 | 1857 | 2751 | 3391 | 4425 | 5522 | 6423 | 7144 | 7640 | 8663 | 9499 |
| 0387 | 1129 | 1889 | 2762 | 3394 | 4429 | 5535 | 6443 | 7151 | 7672 | 8677 | 9591 |
| 0403 | 1132 | 1914 | 2803 | 3404 | 4532 | 5559 | 6465 | 7186 | 7675 | 8861 | 9609 |
| 0416 | 1172 | 1940 | 2841 | 3439 | 4545 | 5585 | 6501 | 7247 | 7716 | 8867 | 9617 |
| 0462 | 1175 | 1997 | 2888 | 3474 | 4616 | 5593 | 6546 | 7273 | 7720 | 8890 | 9675 |
| 0484 | 1176 | 2127 | 2914 | 3603 | 4634 | 5651 | 6550 | 7316 | 7735 | 8914 | 9692 |
| 0501 | 1183 | 2204 | 2925 | 3637 | 4666 | 5715 | 6556 | 7320 | 7935 | 8932 | 9793 |
| 0560 | 1249 | 2222 | 2952 | 3663 | 4768 | 5801 | 6563 | 7327 | 7979 | 8947 | 9803 |
| 0605 | 1252 | 2230 | 2999 | 3670 | 4783 | 5813 | 6611 | 7362 | 7992 | 9041 | 9870 |
| 0618 | 1287 | 2249 | 3068 | 3713 | 4844 | 5884 | 6622 | 7371 | 7994 | 9061 | 9895 |
| 0674 | 1310 | 2261 | 3135 | 3734 | 4963 | 5895 | 6654 | 7374 | 8003 | 9179 | 9972 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

# ‘नारीशक्ती’ वर २७ एप्रिल रोजी विधानसभा विशेष अधिवेशन

■ भोपाल

**नारी**शक्ती वंदन, महिलांचा सर्वांगीण विकास आणि सक्षमीकरण यावर चर्चा करण्यासाठी मध्य प्रदेश विधानसभेचे एक दिवसीय विशेष अधिवेशन २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

हे विशेष अधिवेशन दोन सत्रांमध्ये होणार आहे. पहिले सत्र सकाळी ११ वाजता सुरू होऊन दुपारी १.३० वाजेपर्यंत चालेल. दुसरे सत्र दुपारी ३ वाजता सुरू होऊन सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चालेल. विशेष म्हणजे, विधानसभेने नियम २५१ अंतर्गत मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, त्यानुसार आमदारांना वैयक्तिक आरोप करण्यास मनाई आहे, न्यायप्रविष्ट मुद्दे उपस्थित करता येणार नाहीत आणि संसद किंवा राज्य विधानसभेच्या प्रक्रियेबाबत आक्षेपार्ह भाषा वापरण्यास बंदी आहे. विरोधी पक्षनेते उमंग सिंगार यांनी माहिती दिली की, मध्य प्रदेश विधानसभेच्या या एकदिवसीय विशेष अधिवेशनात विरोधक सहभागी होणार आहेत. मात्र त्यांनी स्पष्ट केले की, लोकसभेच्या विद्यमान ५४३ जागांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यास काँग्रेस समर्थन देईल. परंतु सरकारने इतर कोणताही अजेंडा पुढे आणण्याचा प्रयत्न केला तर विरोधक त्याला योग्य प्रत्युत्तर देतील.

मार्गदर्शक सूचनांनुसार, मुख्य प्रस्तावावर आधारित चर्चा झाल्याशिवाय उच्च प्रोफाईल व्यक्तींवर भाष्य करता येणार नाही. तसेच देशद्रोह हा शब्द आणि मानहानीकारक शब्दांचा वापर करण्यासही मनाई करण्यात आली आहे. या सूचनांमध्ये मतदान विभागणी आणि त्यासंबंधित प्रक्रियेचीही माहिती देण्यात आली आहे.

# ठाण्यात भाजपाचा परप्रांतीयांसाठी मराठी शिकवणी उपक्रम सुरू

**रिक्षाचालक, फेरीवाल्यांना ६ दिवसांत मराठी शिकवणार**

■ ठाणे

**राज्यात** रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयानंतर ठाण्यात एक वेगळाच उपक्रम सुरू झाला आहे. भाजपाच्यावतीने परप्रांतीय रिक्षाचालक आणि फेरीवाल्यांसाठी मराठी शिकविण्याचे विशेष वर्ग आयोजित केले आहेत. ज्या राज्यात आपण राहतो, त्या राज्याची भाषा येणे आवश्यक आहे, या भूमिकेतून हा उपक्रम



राबवण्यात येत असून, याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती भाजपाचे ठाणे शहर चिटणीस ॲड. दीनानाथ पांडे यांनी दिली. मराठी न येणाऱ्या चालकांना नव्या नियमांमुळे अडचणी निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने हे वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

१ मेपासून परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी अनिवार्य केल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. त्यामुळे अनेक परप्रांतीय रिक्षा चालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर दीनानाथ पांडे यांनी ७ दिवसांत मराठी शिकविण्याचा अभ्यासक्रम सुरू केला आहे.

# देवगड समुद्रात अलमका नौका बुडाली! २० खलाशी वाचले

■ देवगड

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील देवगड समुद्रात अलमका नावाची पर्ससीन नौका वादळाच्या तडाख्यात सापडून बुडाली. ही घटना आज देवगड पवनचक्कीसमोरील समुद्रात घडली. सुदैवाने यातील सर्व २० खलाशांना सुखरूप वाचवण्यात आले. मच्छिमारांना सध्याच्या खराब हवामानामुळे समुद्रात न जाण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे .

ही नौका खोल समुद्रात मासेमारी करून देवगड बंदरात परतत होती. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे आणि समुद्रातील उंच लाटांमुळे नौकेचा तोल बिघडला आणि ती बुडाली.

# उत्पादनावर शुल्क व करांच्या सवलतीचे लाभ द्या
# राज्यातील साखर निर्यातदारांना कोर्टाचा दिलासा

■ मुंबई

**राज्यातील** साखर निर्यातदारांना उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. साखर निर्यातदार हे केंद्र सरकारच्या निर्यात उत्पादनावरील शुल्क आणि करांची सवलत या योजनेंतर्गत विविध शुल्क आणि करांच्या सवलती मिळवण्यास पात्र आहेत. त्यामुळे ज्या निर्यातदारांना अद्याप या योजनेनुसार सवलत मिळालेली नाही, त्यांना ती त्वरित देण्यात यावी, असे आदेश न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला दिले आहेत.

रिका ग्लोबल इम्पेक्स लिमिटेड व इतर कंपन्यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या होत्या. विविध याचिकांवर न्यायालयाने १८ पानी निकाल दिला आहे. केंद्र सरकारने साखरेची निर्यात ‘मुक्त’ ऐवजी ‘प्रतिबंधित’ श्रेणीत टाकली असली तरी, ती पूर्णपणे बंदी असलेली श्रेणी नाही. त्यामुळे साखर निर्यातदारांना निर्यात उत्पादनावरील शुल्क आणि करांच्या सवलत योजनेचे फायदे नाकारणे अन्यायकारक आहे, असे न्यायालयाने निकालपत्रात म्हटले आहे. ज्या निर्यातदारांना याआधी सवलती मिळाल्या होत्या आणि नंतर त्या सरकारने परत घेण्यास सांगितले होते, अशा निर्यातदारांना त्यांचे पैसे ६ टक्के व्याजासह ४ आठवड्यांत परत करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यापूर्वी गुजरात उच्च न्यायालयाने ‘श्री रेणुका शुगर्स’ आणि ‘सत्येंद्र पॅकेजिंग’ या कंपन्यांसंदर्भात अशाच स्वरूपाचा निकाल दिला होता. सर्वोच्च न्यायालयानेही त्यावर शिक्कामोर्तब केले होते. याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने केंद्र सरकारला खडे बोल सुनावले आहेत. जेव्हा एखादा कायदेशीर मुद्दा एका उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात निकाली निघतो, तेव्हा तोच मुद्दा पुन्हा दुसऱ्या न्यायालयात खेचून वेळ आणि पैसा वाया घालवू नये.

•स•स्ने•ह नि•मं•त्र•ण•

मुंबई कोकण विभागीय मजूर सहकारी संघ मर्यादित
(नोंदणी क्रमांक : एएन. / पीआरडी. / एल-२ / २००५ पुणे, दिनांक २३-०३-२००५)
आयोजित
सभासद संस्थांचे भव्य
प्रशिक्षण शिबीर
शुक्रवार, दि 24 एप्रिल 2026 रोजी, सकाळी 9.30 ते दुपारी 2.30 पर्यंत

उद्घाटक
मा. ना. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले
सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, लातुर

कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. ना. श्री. प्रविणभाऊ दरेकर
अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं-समुह पुनर्विकास प्राधिकरण
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या.,पुणे
अध्यक्ष, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., मुंबई

प्रमुख पाहुणे
मा. श्रीमती रितुजी तावडे
महापौर, मुंबई महानगर पालिका
मा. श्री. संजय घाडी
उपमहापौर, मुंबई महानगर पालिका

आयोजक
सुनिल बांबुलकर
अध्यक्ष
सुहास गमरे
उपाध्यक्ष
लक्ष्मण आंगणे
सचिव

प्रभु बिरादार, अनिल गडकर, दादासाहेब इंगळे, दिनकर मोहिते
शशिकांत पाध्ये, श्रीकांत राणे, उमेश वराडे, मोहन अंधेरे
मोहन शेट्टी, श्रीमती रेणुका कांबळे, श्रीमती स्वाती करांडे

स्थळ
कोहिनुर मंगल कार्यालय,
दादर (पूर्व) रेल्वेस्टेशन समोर
दादर (पूर्व),
मुंबई ४०० ०१४

# जम्बो कोविड सेंटर घोटाळा
# ५०० पानांचे आरोपपत्र दाखल

■ मुंबई

**कोरोना** महामारीच्या काळातील कथित जम्बो कोविड सेंटर गैरव्यवहार प्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने एस्प्लनेड न्यायालयात ५०० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. मेसर्स ओक्स मॅनेजमेंट कन्सल्टन्सी प्रायव्हेट लिमिटेड आणि राहुल गोम्स यांच्या विरोधात हे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. यामध्ये ८ साक्षीदारांचे जबाब आहेत.

या कथित गैरव्यवहाराच्या तपासात सिडकोचे निवृत्त अधिकारी राजेंद्र घायाडकर यांचेही नाव पुढे आले आहे. त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (बीएनएसएस) कलम १९७ अन्वये मंजुरी मागितली आहे. घायाडकर यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी परवानगी मिळावी यासाठी सिडकोच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पोलिसांनी लेखी अर्ज केला आहे.

कोविड काळात राहुल गोम्स यांनी दोन बनावट कंपन्यांच्या नावावर सिडकोकडून परवानग्या मिळवल्याचा आरोप करत आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला असून त्याचा तपास सध्या सुरू आहे.

# लेह हिंसाचार प्रकरणात नगरसेवकाला जामीन

■ श्रीनगर

**सप्टेंबर** २०२५ मध्ये लेह येथे झालेल्या हिंसाचार प्रकरणात जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाने विद्यमान नगरसेवक स्मनला दोरजे नुरबू आणि माजी आमदार देलदान नामग्याल यांना जामीन मंजूर केला आहे.

या प्रकरणात नुरबू आणि नामग्याल यांना त्यांच्या कथित भूमिकेसाठी अटक करण्यात आली होती. आरोप होता की, नुरबू यांनी २३ सप्टेंबर २०२५ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेद्वारे हिंसाचाराला चिथावणी दिली, त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाले. नामग्याल यांच्या विरोधात सीसीटीव्ही फुटेजमध्ये जमावाचे नेतृत्व करताना, दगडफेक करताना आणि पुरावे नष्ट करण्यासाठी कॅमेऱ्याची तोडफोड करताना दिसल्याचा आरोप करण्यात आला. सरकारने असा युक्तिवाद केला की, दोन्ही आरोपी राजकीयदृष्ट्या प्रभावशाली असल्याने ते जामिनावर सुटल्यास पुरावे नष्ट करू शकतात किंवा तपासावर परिणाम करू शकतात. मात्र बचाव पक्षाने म्हटले की, हे सर्व आरोप राजकीय वैमनस्यातून लावण्यात आले. नुरबू यांची पत्रकार परिषद ही उपोषण करणाऱ्यांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त करण्यासाठी होती. त्यात कोणतीही हिंसाचाराची चिथावणी नव्हती. घटनेच्या दिवशी तर ते रुग्णालयात होते. नामग्याल यांच्याबाबतही आरोप खोटे आहेत.दोन्ही आरोपी सुमारे सात महिन्यांपासून कोठडीत आहेत. आरोपपत्र दाखल झाले आहे आणि समान परिस्थितीतील इतर आरोपींना आधीच जामीन देण्यात आला आहे.

# जनकल्याण बँकेच्या जुन्या तडजोड प्रस्तावावर फेरविचारास कोर्टाचा नकार

■ मुंबई

**चेंबूर** येथील जनकल्याण सहकारी बँक संदर्भातील जुन्या तडजोड प्रस्तावावर फेरविचार करण्यास उच्च न्यायालयाने स्पष्ट नकार देत बँकेला दिलासा दिला. एकदा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन प्रकरण निकाली निघाले असेल, तर अनेक वर्षांनंतर तोच विषय पुन्हा उघडता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात एटीएन पॅकेजिंग खासगी मर्यादित कंपनीसह काही कर्जदारांनी जनकल्याण सहकारी बँकेकडून कर्ज घेतले होते. मात्र ठरलेल्या मुदतीत परतफेड न झाल्याने सन २००४ मध्ये संबंधित कर्ज खाते थकीत आणि अनुत्पादक म्हणून घोषित केले. त्यानंतर बँकेने नियमानुसार वसुलीची कारवाई सुरू केली.

# पुणे-वाराणसी अमृत भारत एक्स्प्रेस २४ एप्रिलपासून सुरू होणार



■ पुणे

**काशी** विश्वनाथ मंदिर येथे दर्शनासाठी वाराणसीला जाणाऱ्या पुणेकरांसाठी आता दिलासा मिळणार आहे. पुणे आणि वाराणसी दरम्यान थेट अमृत भारत एक्स्प्रेस सुरू करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असून ही ट्रेन २४ एप्रिलपासून धावणार आहे.

अमृत भारत एक्स्प्रेस ही वंदे भारत एक्स्प्रेसची आवृत्ती मानली जाते. आधुनिक सुविधा आणि तुलनेने कमी भाडे यामुळे सर्वसामान्य प्रवाशांसाठी हा पर्याय आकर्षक ठरणार आहे. या ट्रेनला दोन्ही बाजूंना इंजिन असल्यामुळे वेगाने गती वाढवणे आणि थांबवणे शक्य होते, परिणामी प्रवास अधिक जलद आणि सुरळीत होतो. ही ट्रेन दर बुधवारी सकाळी ७:५५ वाजता पुणे जंक्शनवरून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२:१५ वाजता वाराणसीला पोहोचेल.

परतीच्या प्रवासात, दर शुक्रवारी दुपारी ३:०० वाजता वाराणसीहून सुटून शनिवारी रात्री ८:३० वाजता पुण्यात दाखल होईल.मार्गात लोणावळा, पनवेल, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ या महाराष्ट्रातील प्रमुख स्थानकांनंतर खांडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, प्रयागराज छेओकी आणि मिर्झापूर या स्थानकांवरही थांबे असतील.

# सत्यता जपल्याशिवाय जनसंपर्क यशस्वी होत नाही ! टाकेंचे विधान

■ कोल्हापूर



जनसंपर्क क्षेत्रात वेग, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर वाढत असला, तरी सत्यता, विश्वासार्हता आणि नैतिक मूल्ये जपणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. असे विधान विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी केले. शिवाजी विद्यापीठ येथील संख्याशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात जनसंपर्क संस्था भारतच्या कोल्हापूर शाखेचे उद्घाटन झाले. यावेळी प्रवीण टाके यांनी अधिकृत उद्घाटनाची घोषणा केली. कार्यक्रमास भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, आदी मान्यवर उपस्थित होते.

# बीटीएसच्या कंपनीचे अध्यक्ष बँगवर अटकेची टांगती तलवार



■सिओल

**सिओल** - दक्षिण कोरियातील के-पॉप सुपरस्टार बीटीएस या बॉय बँडमुळे जगभर प्रसिद्ध झालेल्या हायबे या संगीत कंपनीचे अध्यक्ष बँग सी-ह्युक यांना अटक होण्याची शक्यता आहे. गुंतवणुकदारांची फसवणूक करून त्यांनी १०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक रक्कम बेकायदेशीररीत्या मिळवल्याचा आरोप आहे.

सिओल मेट्रोपॉलिटन पोलिसांनी त्यांच्या अटकेसाठी न्यायालयाकडे अटक वॉरंट मंजुरीसाठी सरकारी वकिलांमार्फत परवानगी मागितली आहे. २०१९ मध्ये हायबे कंपनी सार्वजनिक होणार नसल्याचे सांगून गुंतवणुकदारांची दिशाभूल केल्याचा आरोप बँग सी-ह्युक यांच्यावर आहे. तसेच आयपीओपूर्वी शेअर्स खासगी इक्विटी फंडाला विकण्यास भाग पाडल्याचेही उघडकीस आले आहे. या व्यवहारात गुप्त कराराद्वारे बँग यांना सुमारे २०० अब्ज वॉन (सुमारे १३६ दशलक्ष डॉलर्स) मिळाले असावेत. या करारानुसार आयपीओनंतरच्या नफ्यातील ३० टक्के हिस्सा देण्याचे आश्वासन दिले होते.

२००५ मध्ये बिग हिट एंटरटेनमेंट या नावाने हायबेची स्थापना करणारे बँग सी-ह्युक हे के-पॉपमधील प्रभावशाली मानले जातात.

# हजारो कामगार गावी गेल्याने भिवंडी यंत्रमाग उद्योग अडचणीत

**भिवंडीतील यंत्रमाग उद्योग सध्या अत्यंत गंभीर संकटातून चालला आहे. युद्धामुळे निर्माण झालेली गॅस टंचाई, उन्हाळी सुट्ट्या आणि शेती कामामुळे या उद्योगातील कामगार गावाकडे स्थलांतरित झाला आहे. त्यामुळे कामगार टंचाई निर्माण होऊन भिवंडीतील शेकडो यंत्रमाग उद्योग आर्थिक अडचणीत सापडले आहेत.**

■ भिवंडी

**कामगारांची** टंचाई भासत असल्याने यंत्रमाग कारखान्यांमध्ये दोन पाळ्यांऐवजी एकाच पाळीत काम सुरू आहे. त्यामुळे उत्पादन निम्म्यावर आले आहे. कारखान्याच्या मालकांना खर्च भागवणे कठिण झाले आहे. काहीजण आपले कारखाने बंद ठेवण्याच्या मनस्थितीत आहेत. कामगारांनी आपल्या गावाकडे स्थलांतर केल्यामुळे यंत्रमाग



कारखान्यांना घरघर लागली आहे. त्यातच कच्च्या मालाची कमतरता आणि गॅस सिलिंडरची टंचाई यामुळे हा उद्योग ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. त्याचप्रमाणे यंत्रमाग उद्योगापेक्षा जास्त मेहनताना आणि कामाची ठरलेली वेळ या कारणास्तव कामगार अन्य क्षेत्राकडे आकर्षित होत आहेत. याचा थेट परिणाम उत्पादनक्षमतेवर होत असून, यंत्रगाम उद्योजकांना वेळेत माल पोहोचवणे अवघड झाले आहे.कामगार टंचाईमुळे तर ३० टक्के कमी उत्पादन होताना दिसत आहे.

# जुन्नरचा कांदा उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात

■ नारायणगाव

**जुन्नर** तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या दुहेरी संकटात सापडला आहे. एकीकडे तापमानाने ४० अंशांचा टप्पा ओलांडल्याने अंगाची लाहीलाही होत आहे, तर दुसरीकडे कांद्याचे कोसळलेले बाजारभाव आणि वाढती मजुरी यामुळे या शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.

कडाक्याच्या उन्हामुळे शेतात उभे राहणेही कठीण झाले असताना कांदा काढणीचा हंगाम सुरू असल्याने शेतकऱ्यांना उन्हातच काम करावे लागत



आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, पावसाळ्यात वापरली जाणारी छत्री आता उन्हापासून बचावासाठी वापरावी लागत आहे. शेतात मजूर आणि महिला डोक्यावर छत्री धरून कांदा उपटताना दिसत असून हे चित्र अत्यंत विदारक आहे. कांदा पिकासाठी लागणारा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. लागवड,खते,औषध फवारणी आणि मशागत मिळून शेतकऱ्याला एकरी किमान ५० ते ६० हजार रुपये खर्च येतो.

मात्र,बाजारात मिळणारा भाव अत्यंत कमी असल्याने हा खर्चही परत मिळत नाही. सध्याच्या परिस्थितीत गुंतवलेल्या भांडवलाच्या ५० टक्के रक्कमही हाती पडत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. रात्रंदिवस कष्ट करून पिकवलेला कांदा मातीमोल दराने विकावा लागत असल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सध्याच्या युगाचा मंत्र 'जगलो तर जगलो'

**नुकताच** साजरा झालेला जागतिक वसुंधरा दिन आणि आजचा जागतिक पुस्तक दिन हे सगळे दिनविशेष त्या त्या विषयासंदर्भात लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याकरीता साजरे होत असतात. याचा कितपत परिणाम होतो हे कधीही ठळकपणाने पुढे येत नाही. परंतु यानिमित्ताने त्या दिवसापुरता का असेना, पण संबंधित विषयाला न्याय देण्याचा छोटासा प्रयत्न होतो. वर्षभरातल्या सगळ्या दिनविशेषांचा एकत्रितपणे विचार केला तर मग ते दिनविशेष जागतिक असोत. राष्ट्रीय स्तरावरचे असो यामधून व्यक्तिगत जनजीवन, सामाजिक जनजीवन आणि जागतिक स्तरावरची जीवनमूल्य व्यवस्था टिकवून ठेवण्याचा हेतू असल्याचेच सिद्ध होते. सध्याचे युग हे इतके वेगवान युग आहे की, दर वर्ष सहा महिन्यांनी बदलणारी परिस्थिती, येणारे नवतंत्रज्ञान, प्रचंड वेगाने होणारे नागरीकरण, त्यासोबत होत असलेले औद्योगिकरण आणि नव्या युगाबरोबर रोजचं स्वतःचं जीवन जुळवून घेण्याची म्हणजेच काळाबरोबर ॲडजेस्ट करण्याची प्रत्येक व्यक्तीची समाजाची किंवा त्या त्या देशांची धडपड प्रचंड विचित्र स्वरूपाची म्हणावी लागते. यासाठी अगदी आताची दोन उदाहरणं जरी लक्षात घेतली तरी एक मोठी तफावत किंवा वस्तुस्थिती डोळ्यासमोर येते. जसे नुकताच साजरा झालेला जागतिक वसुंधरा दिन ज्यातून पृथ्वीच्या संरक्षणाचे संदेश दिले जातात. पृथ्वी हा विषय म्हणजे संपूर्ण ब्रह्मांडाचा ती एक भाग म्हणता येते. सगळं जगच या पृथ्वीवर सामावलेले आहे. त्यामुळे पृथ्वी हेच एक स्वतंत्र जग असेल. तर तो जागतिक पृथ्वीदिन म्हणणेदेखील चुकीचे ठरते. त्याला केवळ पृथ्वीदिनच म्हणायला हवे. हा दिन साजरा करण्याला चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी सुरुवात झाली. आणि या सगळ्या कालावधीमध्ये पृथ्वीचे अभूतपूर्व शोषण झाल्याचेही पाहायला मिळते. एकीकडे पृथ्वी वाचवा म्हणून टाहो फोडायचा आणि दुसरीकडे दोन-दोन, तीन-तीन वर्षे सुरू राहतील अशी युद्धे चालू ठेवायची. याशिवाय जंगलतोड, नागरीकरण, औद्योगिकरण किंवा तंत्रज्ञानाचा भडीमार याचा विचार केला तर पृथ्वी वाचवण्यापेक्षाही रोजच्या आपल्या जीवनात पण कसे वाचू शकू याचे भ्रांत मनुष्याला पडलेली असते.

### रोजच्या जगण्याची धडपड

एकूण जगभरातले वेगवान आणि धकाधकीचे जीवन तंत्रज्ञानाने आपल्या कब्जात घेतलेले आहे. पूर्वी असे म्हटले जायचे की, घड्याळाबरोबर किंवा काळाबरोबर माणसाला धावावे लागते. परंतु आज काळालाही मागे टाकेल अशा प्रकारचे तंत्रज्ञान आकाराला येत आहे. घड्याळ जवळपास हद्दपार झाल्यासारखी स्थिती वाटायला लागते. चोवीस तास चालणारी कामं किंबहुना आजच्या कॉर्पोरेट जीवनामध्ये गलेलठ्ठ पगाराच्या पॅकेजसाठी चौदा-चौदा तास काम करण्याची केली जाणारी सक्ती घड्याळालाही बाद करणारी म्हणावी लागते. अशा परिस्थितीत येणारा एखादा जागतिक पुस्तक दिवस आणि त्यातून 'वाचाल तर वाचाल' यासारखे दिले जाणारे संदेश इतके गैरलागू वाटू लागतात की, आजच्या या वेगवान युगामध्ये कोणालाही पुस्तकं वाचण्यासाठी वेळ उपलब्ध होत नाही. जे काही वाचलं जातं ते आपली नोकरी, व्यवसाय किंवा बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशीच निगडित असतं. जेवढं आधुनिक तंत्रज्ञान वापरता येईल किंवा ते समजून घेता येईल हेच आजच्या पिढीसाठी सर्वात मोठे ज्ञान मिळवण्याची स्पर्धा ठरते. जिथे वेळच्यावेळी जेवायला किंवा झोपायलाही वेळ नाही तिथे अवांतर काही वाचायला मिळेल याची शक्यताही उरत नाही. भविष्यकाळात येणारे कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग हे मनुष्याच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेलाच गैरलागू ठरवण्याची शक्यता वाटू लागली आहे. किंवा येणाऱ्या या आगामी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात वेळ काढून एखाद दुसरे पुस्तक वाचणं हाच एक मोठा कृत्रिमपणा करण्याची शक्यता आहे. पुस्तकांविषयी प्रेम वाढावं, वाचन संस्कृती टिकावी, पुस्तकांमधून सामाजिक सभ्यता, जीवन जगण्याची उच्च मूल्य याविषयीचा लाभ करून घेता येतो अशी एकेकाळी श्रद्धा होती. पण जीवनातली गतिमानता इतकी अफाट झाली आहे की, जो तंत्रज्ञानाशी जोडला गेलेला नाही तोच आपला वेळ घालवण्यासाठी पुस्तक वाचण्याचा उद्योग करू शकतो. विशेषतः आजच्या तरुण पिढीला शिक्षण आवश्यक तो रोजगार मिळवणे, आपलं करिअर यशस्वी करणं आणि आपलं भवितव्य अधिकाधिक सुखी आणि स्थिर करण्यासाठीच प्रचंड झटापट करावी लागते आहे.

### ...तर भोंदूगिरी वाढलीच नसती

अशावेळी 'वाचाल तर वाचाल' हे तर रद्दबातल होतंच. रोजची जगण्याची धडपड आणि बदललेली यशस्वी जीवनाची व्याख्या याचा विचार केला तर पुस्तकं वाचून जीवन जगण्याची शक्यता किंवा आपण वाचू शकू, अशा प्रकारची संकल्पना शिल्लकच राहत नाही. रोजचा दिवस नीट पार पडला म्हणजेच वर्तमानातला आजचा दिवस व्यवस्थित गेला तरी योग्य पद्धतीने आपण जगू शकलो याचे समाधान मिळत राहते. म्हणूनच आताच्या या युगात 'वाचाल तर वाचाल' किंवा 'पृथ्वी वाचली तर आपण वाचू' याचा कुठलाही विचार करण्याइतपत वेळ आताच्या या येणाऱ्या पिढीकडे उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. रोजचं आयुष्य म्हणजे 'वाचलो तर वाचलो' एवढ्याच वर्तमान परिस्थितीशी जोडलेले राहते. संपूर्ण जगभरातली दरवर्षी बदलणारी ही परिस्थिती एक आव्हान म्हणूनच प्रत्येकाला स्वीकारावी लागते. खूप विचार करायला, वाचत बसायला वेळ अपुरा पडतो. वर्षभर जे काही दिवस पाळले जातात त्यातून केवळ त्या त्या गोष्टींविषयी किंवा घटकांविषयी स्मरण करण्यापुरताच हेतू शिल्लक राहतो. जर वसुंधरा दिन किंवा जागतिक पर्यावरण दिन आत्मियतेने साजरा झाला असता तर आजची ही वाढत्या तापमानाची किंवा अचानक उद्भवणाऱ्या अवकाळी पावसाच्या समस्या निर्माणच झाल्या नसत्या. जागतिक पुस्तक दिन असो किंवा जावे ग्रंथांच्या गावा यासारखे उपक्रम असो यातून जर वाचनसंस्कृती वाढली असती तर अशोक खरातची भोंदूगिरी चालूच शकली नसती.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

कोणत्याही संकटाशिवाय मिळणारे यश हा विजय ठरतो, पण अनेक संकटांना सामोरे जाऊन मिळवलेला विजय इतिहास घडवतो.

**पंचांग**

**गुरुवार, २३ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



**रवी उदय- ०६-१७**
**रवी अस्त- १८-५७**

* वैशाख शुक्ल सप्तमी
* नक्षत्र - पुनर्वसू
-: जन्मराशी :-
००-०१ ते १५-१३ मिथुन
१५-१४ ते २४-०० कर्क

**गंगासप्तमी, गंगोत्पती, गंगापूजन, गुरुपुष्यामृत रात्री ८.५७ पासून सूर्योदयापर्यंत, जागतिक पुस्तक दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

**पाककृती**



## कलिंगडचे सरबत

★ **साहित्य :** कलिंगडाचे लहान तुकडे - २०० ग्रॅम, सब्जा - ३० ग्रॅम, रोज सिरप - ५० मि.ली., बर्फाचे तुकडे - ३ ते ४, दूध - १ लीटर, साखर - २ चमचे (गरज असल्यास), गुलाब पाकळ्या: सजावटीसाठी.

★ **कृती:** सर्वप्रथम दूध उकळून घ्या. ते थंड होऊ द्या. एका बाऊलमध्ये पाणी घेऊन त्यात सब्जा भिजत ठेवावा. काही वेळाने सब्जा चांगला फुलतो. यानंतर कलिंगडाचे अगदी लहान तुकडे करून घ्यावेत. एका मोठ्या भांड्यात हे तुकडे घालून त्यात बर्फाचे खडे, भिजवलेला सब्जा आणि रोज सिरप घालावे. त्यानंतर त्यात आधी उकळवून थंड केलेले दूध ओतावे. सर्व मिश्रण चमच्याने नीट हलवून एकत्र करावे.



शेवटी तयार झालेले सरबत ग्लासात ओतून वरून कलिंगडाचे काही तुकडे घालून सर्व्ह करावे. अधिक थंड हवे असल्यास हे सरबत काही वेळ फ्रिजमध्ये ठेवून गार करूनही पिऊ शकता.

सरबत बनवताना दूध पूर्णपणे थंड झाल्यावरच वापरावे. कलिंगडाचे तुकडे बिया काढून लहान करून घ्यावेत. अधिक गार चव हवी असल्यास सर्व्ह करण्यापूर्वी काही वेळ फ्रिजमध्ये ठेवू शकता.

उन्हाळ्यात शरीराला थंडावा देणारे आणि चवीला गोडसर असे हे 'मोहब्बत का शरबत' घरच्या घरी अगदी सहज तयार करता येते.



**क्रीडा**

# राजस्थान रॉयल्सचा लखनौवर थरारक विजय

**राजस्थान रॉयल्स विरुद्ध लखनौ सुपर जायंट्स यांच्यात लखनौच्या एकाना स्टेडियमवर कमी धावसंख्या असूनही या सामन्यात राजस्थानने थरारक विजय मिळवला. राजस्थानने लखनौला १६० धावांचे माफक आव्हान दिले होते. पण लखनौला ते पेलवले नाही. लखनौचा डाव १८ षटकांत ११९ धावांवर संपुष्टात आला. राजस्थानने ४० धावांनी विजय मिळवला.**



■ लखनौ

**या सामन्यात** राजस्थानच्या डावाची सुरुवात सावध झाली. मात्र सुरुवातीलाच अतिरिक्त धावा आणि लखनौच्या क्षेत्ररक्षणातील चुका यामुळे राजस्थानचा फायदा झाला. यशस्वी जयस्वालने सुरुवातीला फटकेबाजी करत धावफलक हलता ठेवला, तर वैभव सूर्यवंशीने सलग दोन चौकार ठोकून आक्रमकता दाखवली. मात्र मोहम्मद शमीने शानदार पुनरागमन करत एकाच षटकात यशस्वी जयस्वाल आणि ध्रुव जुरेल यांना बाद केले. जयस्वालचा झेल ऋषभ पंतने एका हाताने टिपला. त्यानंतर मोहसिन खानने वैभव सूर्यवंशीलाही बाद केले. त्यामुळे राजस्थानची अवस्था डळमळीत झाली. कर्णधार रियान परागने संयमी खेळी करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने मयंक यादववर षटकार ठोकत संघाचे अर्धशतक पूर्ण केले. परागने १९ चेंडूंत २० धावा केल्या. प्रिन्स यादवच्या चेंडूवर तो बाद झाला. दुसऱ्या बाजूला रवींद्र जडेजा आणि डोनोव्हन फरेरा यांनी एकेरी-दुहेरी धावांवर डाव पुढे नेला. फरेराला एकदा जीवदानही मिळाले, पण प्रिन्स यादवने त्याला २० धावांवर बाद केले. १५ व्या षटकात राजस्थानने १०० धावांचा टप्पा पार केला. अखेरच्या टप्प्यात शुभम दुबेने १९ व्या षटकात दोन चौकार ठोकून संघाला गती दिली. शेवटचे षटक मात्र पूर्णपणे रवींद्र जडेजाने गाजवले. मयंक यादवच्या गोलंदाजीवर त्याने तीन चौकार आणि अखेरच्या चेंडूवर षटकार ठोकत तब्बल २० धावा केल्या. यामुळे राजस्थानला २० षटकांत ६ बाद १५९ धावा करता आल्या.

लखनौच्या डावाची सुरुवातच डळमळीत झाली. पहिल्याच षटकाच्या शेवटच्या चेंडूवर आयुष धावबाद झाला. यानंतर नांद्रे बर्गरने कर्णधार ऋषभ पंतला खाते उघडू न देताच तंबूत पाठवले. तर आर्चरने एडन मार्करमलाही शून्यावर बाद केले. लखनौची अवस्था ३ बाद ११ झाली. त्यानंतर एम. मार्शने संघाला आशेचा किरण दाखवत ४१ चेंडूंत ५५ धावा करत अर्धशतक पूर्ण केले. मात्र नांद्रे बर्गरने त्यालाही परत पाठवत लखनौच्या आशेवर पाणी फिरवले. १५ व्या षटकात, रवी बिश्नोईने एका अप्रतिम चेंडूवर हिम्मत सिंगला बोल्ड केले. त्यानंतर शमी मोहम्मद ६ तर मुकुल यादव ७ धावांवर बाद झाले. सुरुवातीच्या षटकांत राजस्थानच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत लखनौला मोकळेपणाने खेळू दिले नाही. फलंदाजांना फटकेबाजी करता आली नाही आणि धावगतीही मंदावली. पहिल्या सहा षटकांत म्हणजेच फलंदाजीवरील निर्बंध काळात लखनौला केवळ ३१ धावा करता आल्या, तर तीन महत्त्वाचे बळी गमवावे लागले.

## आनंदराव अडसूळ ट्रस्टतर्फे २५ एप्रिलला निवड कॅरम स्पर्धा

■ मुंबई

**महाराष्ट्र** दिन आणि कामगार दिनानिमित्त आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शालेय मुलामुलींसाठी विनाशुल्क निवड चाचणी कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २५ एप्रिल रोजी दादर पश्चिम येथे होणार असून, विजेत्यांना १ मेपासून सुरू होणाऱ्या सांघिक स्पर्धेत थेट प्रवेश मिळणार आहे.

१८ एप्रिलपासून सुरू झालेल्या कामगार व शालेय मुलामुलींसाठीच्या महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्तच्या पूर्णपणे मोफत कॅरम उपक्रमाला यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आनंदराव अडसूळ, पदाधिकारी सुनील साळवी, नरेंद्र सावंत यांनी आयोजन केले आहे. निवड झालेल्या खेळाडूंचे संघ तयार करण्यात येणार असून १ ते ३ मे या कालावधीत अटीतटीचे सामने रंगणार आहेत. तसेच शालेय खेळाडूंना तज्ज्ञांचे मार्गदर्शनही मोफत दिले जाणार आहे. या अंतिम टप्प्यातील उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शालेय खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण किंवा प्रमुख पंच चंद्रकांत करंगुटकर यांच्याशी २३ एप्रिलपर्यंत संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## एसएनडीटी महिला विद्यापीठात आज खो-खो अंतिम लढतीचा थरार

■ मुंबई

**एसएनडीटी** महिला विद्यापीठच्या जुहू परिसरात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ महिला खो-खो स्पर्धा २०२५-२६ चा अंतिम सामना गुरुवार,उद्या सायंकाळी ७ वाजता रंगणार आहे. उपांत्य फेरीतील सामने आणि त्यानंतर होणाऱ्या अंतिम लढतीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत एसएनडीटी महिला विद्यापीठ विरुद्ध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विरुद्ध मुंबई विद्यापीठ अशा २ दमदार लढती होणार आहेत. या सामन्यांतील विजेते संघ अंतिम फेरीत आमनेसामने येणार आहेत. उपउपांत्य फेरीतील सामन्यांत एसएनडीटी महिला विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

## आज मुंबई विरुद्ध चेन्नईचा महामुकाबला

■ मुंबई

**मुंबई** इंडियन्स संघाने मागील सामन्यात गुजरात टायटन्सवर ९९ धावांनी दणदणीत विजय मिळवत आत्मविश्वास परत मिळवला. सलग चार पराभवानंतर हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई संघासाठी हा विजय मोठा दिलासा देणारा ठरला. फलंदाजांनी दमदार खेळी करत मोठी धावसंख्या उभारली तर गोलंदाजांनी प्रतिस्पर्धी संघाला पूर्णपणे रोखून धरले. दुसरीकडे, चेन्नई सुपर किंग्स संघाने घरच्या मैदानावर दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध सलग विजय मिळवत पुनरागमनाची चिन्हे दाखवली होती. मात्र, मागील सामन्यात सनरायझर्स हैदराबादकडून पराभव पत्करावा लागल्याने त्यांची लय पुन्हा विस्कळीत झाली. त्यामुळे मुंबईविरुद्धच्या या सामन्यात चेन्नई संघ नव्या जोमाने उतरण्याची शक्यता आहे. वानखेडे स्टेडियम फलंदाजांसाठी अनुकूल मैदान मानले जाते. छोट्या सीमारेषा, वेगवान आउटफिल्ड आणि सपाट खेळपट्टीमुळे येथे मोठ्या धावसंख्या सहज उभ्या राहतात. अरबी समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यामुळे नव्या चेंडूला सुरुवातीला स्विंग मिळू शकतो.

## आमदार चषकात शिवशक्तीच शक्तिशाली

**मुंबई** - क्रीडाप्रेमी आमदार सुनील राऊत यांच्या आमदार चषक कबड्डी स्पर्धेतील महिला गटाच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या शिवशक्ती महिला संघाने पुण्याच्या राजमाता जिजाऊ संघावर ३२-३० असा थरारक विजय मिळवला. विक्रोळी पूर्व येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सुरू असलेल्या कबड्डी महोत्सवात हा अंतिम सामना पार पडला.

**फॉर्म जी (पुनःपारित)**
**मुंबई येथे सर्व प्रकारच्या प्राथमिक व दुय्यम दर्जाच्या पोलाद आणि पोलादी उत्पादनांचा व्यापार, प्रक्रिया, उत्पादन, आयात, निर्यात, व्यवहार आणि वितरण या व्यवसायात कार्यरत**
**गुजरात पौसित्रा स्टील कंपनी लिमिटेड करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन आणि सीआयएन / ~~एलएलपी क्र.~~ | गुजरात पोसित्रा स्टील कंपनी लिमिटेड सीआयएन: U27100MH2005PLC152813 पॅन: AACCG3370L |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | नोंद. कार्यालय: १३/१९८, जे. टाटा रोड, खेतान भवन, चर्चगेट, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२०. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | उपलब्ध नाही |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता वित्तीय विवरणपत्रानुसार कॉर्पोरेट ऋणकोकडे कोणतीही अचल संपत्ती नाही. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | माहिती उपलब्ध नाही |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | माहिती उपलब्ध नाही |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | माहिती उपलब्ध नाही |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी उपलब्ध असलेले यूआरएल: | cirp.gpscl@npvinsolvency.in येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराच्या पात्रता उपलब्ध असलेले यूआरएल: | cirp.gpscl@npvinsolvency.in येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक: | ०८.०५.२०२६ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | ११.०५.२०२६ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | १६.०५.२०२६ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | २१.०५.२०२६ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | २६.०५.२०२६ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | २५.०६.२०२६ |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | cirp.gpscl@npvinsolvency.in |
| १७. | कॉर्पोरेट ऋणकोच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीचा तपशील | एमएसएमई कडे नोंदणी नाही |

सही/-
आयपीई - एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड)
त्यांचे संचालक - श्री. मोहीत बिपिनचंद्र अदातिया यांच्याद्वारे
गुजरात पोसित्रा स्टील कंपनी लिमिटेडच्या प्रकरणात
ठराव व्यावसायिक म्हणून नियुक्ती
आयबीबीआय नोंद. क्र. IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021
एएफएची वैधता: ३१ डिसेंबर, २०२६
पत्ता: १० वा मजला, १००३, झिआॅन झेड१, रामदास रोड, ॲव्हलॉन हॉटेलजवळ, थलतेज, अहमदाबाद - ३८००५९, गुजरात
दिनांक: २३.०४.२०२६
ठिकाण: जुनागड

**सूचना**
**विभागीय संचालक यांच्या समक्ष**
**पश्चिम विभाग । मुंबई**
कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि कंपन्यांचे (स्थापना) नियमन २०१४ च्या नियमन ३० च्या उप-नियमन (५) च्या खंड (अ) च्या प्रकरणामध्ये
आणि
**एल्डोराडो इन्व्हेस्टमेंट्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेड** (यापश्चात 'कंपनी' किंवा 'याचिकाकर्ता कंपनी' असे उल्लेखित) नोंदणीकृत कार्यालय - ५०६, १७जी, वर्धमान चेंबर्स, कावसजी पटेल मार्ग, फोर्ट, हॉर्निमन सर्कल, मुंबई ४०० ००१ यांच्या प्रकरणामध्ये.
सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी त्यांचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्य येथून कर्नाटक राज्य येथे बदलण्यास कंपनीस सक्षम करण्याकरिता मंगळवार, दि. २१ एप्रिल, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या विशेष ठरावानुसार कंपनीच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनमधील बदलास मंजुरी मिळविण्याकरिता, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ अन्वये विभागीय संचालक, पश्चिम विभाग यांच्याकडे अर्ज करण्याचे कंपनी प्रस्तावित आहे.
कोणी व्यक्ती, ज्यांचे हितसंबंध कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे बाधित होत असल्यास त्यांनी गुंतवणूकदार तक्रार अर्ज भरून एमसीए-२१ पोर्टल (www.mca.gov.in) वर कळवावे किंवा त्याचे/तिचे आक्षेप, त्याच्या/तिच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि विरोधाची कारणे नमूद केलेले प्रतिज्ञापत्र विभागीय संचालक, पश्चिम विभाग यांना सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत स्वतः किंवा अन्य कोणाही तर्फे पोहोचवावे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे व त्याची प्रत याचिकाकर्ता कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत कार्यालय ५०६, १७जी, वर्धमान चेंबर्स, कावसजी पटेल मार्ग, फोर्ट, हॉर्निमन सर्कल, मुंबई ४०० ००१, महाराष्ट्र येथे पाठवावी.
**एल्डोराडो इन्व्हेस्टमेंट्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेड करिता**
**सही/-**
**याझदीन मिस्त्री (संचालक)**
**डीआयएन ०७८९७९९५**
दिनांक: २३ एप्रिल, २०२६, ठिकाण: मुंबई

**जाहीर सूचना**
सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही मुंबई बेट शहराच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील ताडदेव विभागाचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ४२ धारण केलेल्या मालमत्तेवर बांधलेल्या, ३६, खाटुवाडी, नौशिर भरूचा मार्ग, स्लेटर रोड, ग्रॅण्ट रोड (पश्चिम), मुंबई - ४०० ००७ येथे स्थित आकृती-आदित्य (यापश्चात "**सदर इमारत**" असे उल्लेखित) असे ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील ८ व्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ८०२, मोजमाप अदमासे ८०२ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ, आणि ९ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ९०२, मोजमाप अदमासे ९७५ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह सदनिका क्र. ८०२ करिता वाटप केलेली सदर इमारतीच्या कंपाऊंडमधील एक (१) वाटप केलेली कार पार्किंग जागा क्र. २४ आणि सदनिका क्र. ९०२ करिता वाटप केलेल्या सदर इमारतीच्या कंपाऊंडमधील लोअर तळघरातील पार्किंग जागा क्र. ७, तळघरातील पार्किंग जागा क्र. बी-०६, आणि खुल्या कार पार्किंग जागेमधील पार्किंग जागा क्र. एम-०२ अशा वाटप केलेल्या तीन (३) कार पार्किंग जागा; आणि सदनिका क्र. ८०२ च्या संदर्भातील, सदस्य नोंदणी क्र. २५, भाग प्रमाणपत्र क्र. ८०२ अंतर्गत डिस्टिंक्टिव्ह क्र. १२१ ते १२५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले दर्शनी मूल्य रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे पाच (५) समभाग आणि सदनिका क्र. ९०२ च्या संदर्भातील, सदस्य नोंदणी क्र. २७, भाग प्रमाणपत्र क्र. ९०२ अंतर्गत डिस्टिंक्टिव्ह क्र. १३१ ते १३५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले दर्शनी मूल्य रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे पाच (५) समभाग, दोन्ही आकृती-आदित्य को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड द्वारे पारित; व त्यासह त्याच्याशी संबंधित सर्व लाभ, सुविधा आणि अनुषंगिक वस्तू (एकत्रितरित्या, "**सदर जागा**") च्या संदर्भात **श्री. मेहुल प्रविणचंद्र शाह** (यापश्चात "**मालक**" असे उल्लेखित) यांच्या शीर्षकाची योग्य चौकशी आणि तपासणी करीत आहोत. सदर जागा सर्व बोजे, प्रभार, विवाद, दावे, धारणाधिकार, किंवा कोणत्याही स्वरुपाचे गहाणवट यापासून मुक्त आहे.
उपरोल्लेखित जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात वारसा, हिस्सा, विक्री, गहाणवट, भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, भेट, ताबा, देवाणघेवाण, तारण, अभिहस्तांकन, हमी, न्यास, मृत्युपत्र, भाडेकरू, शीर्षक हस्तांतरण किंवा लाभार्थी हितसंबंध, पोट-भाडेकरू, प्रभार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, देखभाल, वहिवाट, न्यायालयीन आदेश किंवा कोणत्याही स्वरुपाचा बोजा या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणतेही दावे किंवा हक्क असणाऱ्या सर्व व्यक्तींनी निम्नस्वाक्षरीकार यांना त्या दाव्याबाबत लेखी स्वरुपात, सर्व सहाय्यक दस्तऐवजांच्या मूळ प्रमाणित प्रतिंसह सदर सूचना प्रसिद्धीपासून १४ दिवसांच्या आत सादर करावे, असे न केल्यास, अशा व्यक्तींचे दावे, जर असल्यास, स्वेच्छेने त्याग केले, सोडून दिले असे समजण्यात येईल आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.
दिनांक: २३.०४.२०२६
ठिकाण: मुंबई
सही/-
**श्री. रोहित वसंत शिंदे**
ॲडव्होकेट मुंबई उच्च न्यायालय
द्वारा मुकेश एच. जैन, कार्यालय क्र. ए/११८, १ला मजला,
नारायण उद्योग भवन, चिवडा गल्ली, लालबाग, मुंबई ४०००१२.

# अग्निशमन दल नोकरीसाठी विशेष आयटीआय कोर्स अनिवार्य

■ पणजी

**गोवा** अग्निशमन दलात जवान म्हणून भरती होण्यासाठी आता आयटीआयचा विशेष कोर्स अनिवार्य करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांनी ही घोषणा केली आहे. पणजी येथे आयोजित 'करिअर जागोर' कार्यक्रमात मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत हे बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत म्हणाले की, पुढील शैक्षणिक वर्षापासून गोव्यातील सर्व आयटीआय संस्थांमध्ये 'अग्निशमन सेवा' हा एक वर्षाचा विशेष अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. त्यामुळे भविष्यात अग्निशमन दलात जवान म्हणून नोकरी मिळवण्यासाठी हा आयटीआय कोर्स पूर्ण करणे आवश्यक असेल. पूर्वी अग्निशमन दलात भरतीसाठी केवळ १० वी किंवा १२ वी उत्तीर्ण पात्रता होती. आता ही पात्रता बदलून तांत्रिक कौशल्य अनिवार्य करण्यासाठी राज्य सरकार भरती नियमांत बदल करत आहे.

# अश्वगंधाच्या पानांवर बंदी मूळ किंवा अर्क वापरावा

**प्राधिकरणाचे स्पष्ट निर्देश**

■ नवी दिल्ली



भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने जारी केलेल्या नवीन निर्देशानुसार, आरोग्य पूरक उत्पादने आणि न्यूट्रास्युटिकल्समध्ये अश्वगंधाच्या पानांचा वापर करण्यावर पूर्णपणे बंदी घातली आहे. पानांऐवजी केवळ मुळांचा किंवा मुळांच्या अर्काचा वापर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने स्पष्ट केले की, काही उत्पादक कंपन्या अश्वगंधाच्या पानांचा वापर त्यांच्या उत्पादनांमध्ये करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. नियमानुसार परवानगी नसलेल्या वनस्पतींच्या भागांचा वापर करणाऱ्या उत्पादकांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश राज्य यंत्रणांना देण्यात आले आहेत. तसेच, सर्व कंपन्यांनी उत्पादनाच्या लेबलवर वापरलेल्या वनस्पतीचा नेमका भाग स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



# कॅनडात हत्या झालेल्या कार्तिकला ४ वर्षांनी न्याय! आरोपीला जन्मठेप

■ टोरँटो

कॅनडातील टोरँटो येथील भारतीय विद्यार्थी कार्तिक वासुदेव यांच्या हत्येप्रकरणी तब्बल चार वर्षांनंतर न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला. न्यायालयाने दोषी ठरलेल्या रिचर्ड एडविन या आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

टोरँटो उच्च न्यायालयाने आरोपी रिचर्ड एडविन याला प्रथम श्रेणी हत्येचा दोषी ठरवले. न्यायालयाने त्याला पॅरोलची संधी नसलेली जन्मठेप सुनावली. एप्रिल २०२२ मध्ये घडलेल्या दोन स्वतंत्र हत्या प्रकरणांतही आरोपी दोषी आढळल्याचे सांगितले.

या प्रकरणात आरोपीने कार्तिक वासुदेव यांच्यावर गोळीबार केल्याची कबुली दिली होती. मात्र बचाव पक्षाने आरोपी मानसिक आजाराने त्रस्त असल्याचा दावा केला. त्यामुळे त्याला गुन्हेगारी जबाबदारीतून मुक्त करण्याची मागणी केली होती. न्यायालयाने आरोपी मानसिक आजाराने ग्रस्त असल्याचे मान्य केले. मात्र त्याला आपल्या कृतींचे स्वरूप समजत नव्हते, हा युक्तिवाद नाकारला. त्यामुळे आरोपीची गुन्हेगारी जबाबदारी टाळण्याची मागणी फेटाळली.

# मदरसा धर्मगुरूवर अत्याचाराचा आरोप! पीडितेच्या घरावरच हल्ला

■ ढाका

**देश विदेश**

**बांगलादेशातील** नोआखली जिल्ह्यात मदरशातील धर्मगुरूवर अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न केल्याचा आरोप झाल्यानंतर खळबळ उडाली. या प्रकरणात पीडित मुलीच्या कुटुंबियांनी तक्रार दाखल केल्यानंतर संतप्त जमावाने त्यांच्या घरावर हल्ला केल्याची धक्कादायक प्रकार झाला. या प्रकारामुळे बांगलादेशातील कायदा-सुव्यवस्था आणि पीडितांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

नोआखली जिल्ह्यातील सुवर्णचर भागातील एका स्थानिक मदरशात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर मदरशाचे अधीक्षक अबुल खैरवर अत्याचाराचा प्रयत्न केल्याचा आरोप झाला. पीडित मुलीच्या वडिलांनी याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली. तक्रार दाखल झाल्यानंतर आरोपीविरोधात कारवाई होण्याची अपेक्षा असताना उलटेच घडले. सुमारे शंभर जणांच्या जमावाने पीडित मुलीच्या घरावर हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात कुटुंबियांना मारहाण झाली, घरातील वस्तूंची तोडफोड व लूटमारही झाली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संतापाची लाट उसळली.

# मेक्सिकोतील पिरॅमिड परिसरात गोळीबार! १ ठार तर १३ जखमी

■ मेक्सिको सिटी

**हल्लेखोराची आत्महत्या**

**मेक्सिकोतील** जगप्रसिद्ध तेओतिहुआकान पिरॅमिड परिसरात झालेल्या भीषण गोळीबारात एका पर्यटकाचा मृत्यू झाला, तर १३ जण जखमी झाले. 'पिरॅमिड ऑफ द मून' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात घडलेल्या या घटनेनंतर संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले. तर पर्यटकांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. हल्ल्यानंतर सुरक्षा दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच हल्लेखोराने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याच्याकडून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. हल्ल्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. हल्लेखोराची ओळख पटलेली नाही. पर्यटक मोठ्या संख्येने या ऐतिहासिक स्थळाला भेट देतात. पर्यटकांची गर्दी असतानाच एका हल्लेखोराने उंचावरून खालील गर्दीवर अचानक अंदाधुंद गोळीबार सुरू केला. काही क्षणांतच परिसरात आरडाओरडा आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या हल्ल्यात एका कॅनेडियन महिला पर्यटकाचा जागीच मृत्यू झाला.

# उत्तर भारतात उष्णतेची लाट! प्रयागराजचा पारा ४४.४ अंशांवर

■ नवी दिल्ली

**देशातील** मैदानी प्रदेश असलेल्या उत्तरेतील राज्यामध्ये उष्णतेची लाट पसरली आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंदीगड, ओडिशा आणि दिल्लीमध्ये अनेक ठिकाणी पारा ४२ अंशांच्या पुढे गेला आहे. अनेक ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशाराही देण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज शहरात तर काल मंगळवारी तब्बल ४४.४ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली.

मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये पहिल्यांदाच रात्री उष्णतेची लाट येण्याचा इशारा देण्यात आला आहे. भोपाळ, छिंदवाडा, मंडला, नर्मदापुरम, ग्वाल्हेर, रतलाम आणि छतरपूरसह १६ जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज ४४.४ अंश सेल्सिअस तापमानासह देशातील सर्वात उष्ण ठिकाण ठरले. राज्यातील उष्णतेमुळे ८ वीपर्यंतच्या शाळांची वेळ बदलण्यात आली आहे. झारखंडमध्येही आजपासून शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

महाराष्ट्रातील गोंदिया आणि छत्तीसगडमधील बिलासपूरमध्ये काल ४३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दोन्ही जिल्ह्यांमध्ये दुपारी १२.३० ते ४ वाजेपर्यंत वाहतूक सिग्नल बंद करण्यात आले आहेत, जेणेकरून लोकांना चौकांमध्ये उन्हात उभे राहावे लागू नये. दोन्ही राज्यांमध्ये दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत उन्हात काम करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी चाटेचा जीपीएसाठी अर्ज

■ बीड

**बीडच्या** मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी आज बीड येथील विशेष मकोका न्यायालयात पार पडली. सुनावणीदरम्यान आरोपी विष्णू चाटे याच्या वतीने जनरल पॉवर ऑफ अॅटर्नी (जीपीए) संदर्भात अर्ज दाखल करण्यात आला. गाडीचे हप्ते भरणे आणि इतर देणी भागवण्यासाठी बँक खात्यावरील व्यवहारांचे अधिकार देण्यात यावेत, अशी मागणी या अर्जाद्वारे करण्यात आली. या अर्जावर फिर्यादी पक्ष पुढील सुनावणीत आपले म्हणणे मांडणार आहे. सुनावणीदरम्यान आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते, तर दोन्ही बाजूंचे वकील प्रत्यक्ष उपस्थित होते. या प्रकरणातील पुढील सुनावणी ७ मे रोजी होणार आहे. या प्रकरणातील महत्त्वाचा तांत्रिक पुरावा असलेल्या पेन ड्राईव्हमधील ५९ सेकंदांच्या व्हिडिओ फाईलवरही न्यायालयात चर्चा झाली. लॅपटॉपमधून रिकव्हर करण्यात आलेला डेटा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल, अशी माहिती न्यायालयात लेखी स्वरूपात सादर करण्यात आली. सुनावणीनंतर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, आरोपींचे वकील मुद्दाम अडथळे निर्माण करून सुनावणी लांबवण्याचा प्रयत्न करत आहेत.

# कुटेच्या ९.२९ कोटी रुपये किमतीच्या ६ स्थावर मालमत्तांचा ताबा ईडीने घेतला

■ मुंबई

**ईडीने** मनी लॉंड्रिंग प्रकरणातील तपासाच्या अनुषंगाने सुरेश कुटे, त्यांची पत्नी अर्चना कुटे आणि इतरांविरोधात सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या 'ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी' गुंतवणूकदार फसवणूक प्रकरणात ९.२९ कोटी रुपये किमतीच्या सहा स्थावर मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. सुरेश कुटे आणि अर्चना कुटे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या २००२ च्या कलम ८(४) अंतर्गत ही कारवाई १८ आणि १९ एप्रिल रोजी करण्यात आली.

संबंधित मालमत्ता खारघर, मुंबई आणि पुणे येथे असून, त्या सुरेश कुटे, अर्चना कुटे तसेच त्यांच्या संबंधित संस्थांच्या नावावर आहेत. महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यांत दाखल झालेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीने तपास सुरू केला. तपासात उघड झाले की, या क्रेडिट सोसायटीने १२ ते १४ टक्के वार्षिक परताव्याचे आश्वासन देत उच्च परतावा देणाऱ्या ठेवी योजना सुरू केल्या होत्या. या योजनांकडे मोठ्या संख्येने गुंतवणूकदार आकर्षित झाले. मात्र ठेवींची परतफेड न होणे किंवा अपूर्ण परतफेड झाल्याने मोठे नुकसान झाले.

**जाहीर सूचना**

या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येत आहे की, उदय भुवन सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील रुम नं.२ या राहत्या घरामधून याच घराचे शेअर सर्टीफिकेट क्र. २/ शेयर अनुक्रमांक ६ ते १० हे हरवले आहे. या सर्टिफिकेट वर श्रीमती शोभना भानुदास हिंगोणीकर व श्री. भानुदास श्रीधर हिंगोणीकर अशी नावे आहेत. याबाबतची रीतसर तक्रार- Lost Property Reg. No. 0440/2025 दि. ०४/०३/२०२५ रोजी मानपाडा पोलीस ठाणे येथे नोंदवली आहे. याबाबत श्री. हिंगोणीकर यांच्याकडून Duplicate Share Certificate साठीचा पत्रव्यवहार उदय भुवन सोसायटीला प्राप्त झाला आहे. त्यानुसार सोसायटी Duplicate Share Certificate बनवणार आहे. यासंदर्भात कुणाची काही तक्रार असल्यास त्यांनी येत्या १५ दिवसात कार्यकारिणीशी संपर्क साधावा.

**उदय भुवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
भूखंड क्र. २७, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग,
कांजूर सोसायटी, भांडूप (पूर्व),
मुंबई- ४०००४२.

**TENDER NOTICE**

**NEW VASUNDHARA CHSL**

Situated At Jamuna Nagar, Opp. Diwanman Talao, Vasai Road (West) - 401 202.

Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work

Tender can be collected from Society Office.
From: **23/04/2026 upto 28/04/2026**
Between 11.00 Am To 5.00 Pm
Date of Submission up to
**29/04/2026 (up to 5.00 PM)**
at NEW VASUNDHARA CHSL Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT.LTD.
Vision Yours, Execution Ours.

Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East)
Tel. Office. 9820818155


**Tender Cost Rs. 3,000/- (Non-Refundable)**

# केईएम रुग्णालयाचे नाव बदला मंत्री मंगलप्रभात लोढांची मागणी

■ मुंबई

**मुंबईतील** प्रसिद्ध केईएम रुग्णालय पुन्हा एकदा नामांतराच्या मागणीमुळे चर्चेत आले आहे. राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुंबई महानगरपालिकेला अधिकृत पत्र लिहून रुग्णालयाचे नाव बदलण्याची मागणी केली आहे.

मंगलप्रभात लोढा यांनी यापूर्वीही या रुग्णालयाच्या नामांतराचा मुद्दा उपस्थित केला होता. जानेवारी महिन्यात आयोजित कार्यक्रमातही त्यांनी ही मागणी मांडली होती. आता पुन्हा अधिकृत पत्राद्वारे त्यांनी या प्रक्रियेला गती देण्याचे आवाहन केले आहे. लोढा यांच्या प्रस्तावानुसार, ब्रिटिश काळातील 'केईएम' हे नाव बदलून भारतीय संस्कृतीशी सुसंगत नाव देण्यात यावे, अशी त्यांची भूमिका आहे. त्यांनी कौशल्य श्रेष्ठ एकलव्य स्मारक रुग्णालय असे नवीन नाव सुचवले असून, त्यामुळे संक्षिप्त रूप 'केईएम' कायम राहील, असा दावाही करण्यात आला आहे.



# बारामती आणि राहुरीसह २ राज्यांत आज मतदान

■ मुंबई

**राज्यातील** बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी उद्या २३ एप्रिला मतदान होणार असून, निकाल ४ मे रोजी जाहीर केला जाणार आहे.

बारामती मतदारसंघातील जागा अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर रिक्त झाली आहे. तर अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे तेथे पोटनिवडणूक होत आहे. यंदा प्रथमच निवडणूक प्रक्रियेत बदल करण्यात आला असून, मतपेट्या थेट मतदान केंद्रांवर पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांना स्ट्राँग रूममध्ये जाऊन मतपेट्या आणण्याची गरज भासलेली नाही. याशिवाय, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू येथेही उद्या पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये १७ जिल्ह्यांतील १५२ जागांसाठी मतदान होणार असून, तामिळनाडूमध्ये २३४ जागांसाठी निवडणूक लढवली जात आहे. या निवडणुकांमध्ये एकूण ४,०२३ उमेदवार रिंगणात असून, सुमारे ५.७३ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यापूर्वी आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी येथे ९ एप्रिल रोजी मतदान पार पडले होते.

**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर सुचना**

२२/२२ के.व्ही. नेतिवली स्विचींग स्टेशन आणि २२ के.व्ही. सोनारपाडा स्विचीग स्टेशन मधून निघणाऱ्या खालील आऊटगोईग वाहिन्या देखभाल व दुरूस्तीच्या कामाकरिता खाली दिलेल्या वेळेत बंद राहणार असून या काळात कल्याण पूर्व विभागामधील खालील परिसरातील विद्युत पुरवठा पूर्णपणे बंद राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व म.रा.वि.वि.कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

| वाहिनीचे नाव | दिनांक | वेळ | प्रभावित क्षेत्र |
|---|---|---|---|
| २२ के.व्ही. कल्याण वेस्ट वाहिनी क्रं. ३०३ | २३.०४.२०२६ | ०८.०० ते १३.०० | खंबालपाडा, भोईरवाडी, अमाकिन सोसायटी व इतर परिसर |
| २२ के.व्ही. सागाव नांदिवली वाहिनी क्रं. ३०५ | २४.०४.२०२६ | १०.०० ते १४.०० | सागाव, नांदिवली |

कार्यकारी अभियंता,
कल्याण (पूर्व) विभाग

# युद्धविरामाला मुदतवाढ! नाकेबंदी कायम

पान १ वरून

मात्र ट्रम्प यांच्या या मुदतवाढीवर इराणने तिखट प्रतिक्रिया दिली. नाकेबंदी कायम राहील म्हणजे शत्रुत्व कायम राहील. ही नाकेबंदी म्हणजे अमेरिकेने इराणवर बॉम्ब वर्षाव केल्यासारखेच आहे. त्यामुळे त्याला लष्करी कारवाईनेच प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा इराणचे मेहदी मोहम्मदी यांनी दिला. दुसरा वादाचा मुद्दा म्हणजे अमेरिकेच्या नौदलाने इराणच्या तौस्का या जहाजानंतर तिफानी हे इराणचे दुसरे जहाज जप्त केले आहे. तिफानी जप्त केल्यामुळे संतप्त झालेल्या इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्ड कॉर्पने होर्मुजमध्ये अमेरिकेच्या जहाजावर अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात जहाजाचा नियंत्रण कक्ष पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे युद्ध विरामाला मुदतवाढ देऊनही होर्मुजची कोंडी काही एवढ्यात फुटणार नाही,हे आता जवळपास निश्चित झाले आहे. ट्रम्प यांनी जोपर्यंत इराण कायमस्वरुपी युद्धबंदीचा प्रस्ताव देत नाही तोपर्यंत लागू राहील असे म्हटले असले तरी नाकेबंदीच्या मुद्द्यावरून इराणची आक्रमक भूमिका जगाची चिंता वाढवणारी आहे.

# एनसीएलटीत याचिका नोंदणीनंतर कर्जदारांना दिलासा

■ मुंबई

**बँकांकडून** केली जाणारी कर्जवसुली प्रक्रिया आणि कर्जदारांचे हक्क यासंदर्भात उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणात याचिका नोंदविल्या क्षणापासून कर्जदारास कायदेशीर संरक्षण लागू होते. त्यानंतर कोणतीही वसुली कारवाई पुढे नेता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्या. मनिष पितळे व न्या. श्रीराम शिरसाट यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. याप्रकरणी कपोळ जाहिरात संस्थेने या प्रकरणात न्यायालयात धाव घेतली होती. बंधित संस्थेवर एका बँकेचे कर्ज थकले होते. त्यानंतर बँकेने मुलुंड येथील संस्थेच्या दोन सदनिकांचा लिलाव केला होता. या निर्णयामुळे बँकांकडून राबविण्यात येणाऱ्या कठोर वसुली प्रक्रियेला मोठा आळा बसणार असल्याचे मानले जात आहे.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळः कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश**
**किरोल रोड, विद्याविहार (पश्चिम) : मुंबई-४०० ०८६**

ई-मेल: eemumbai@rediffmail.com — फोन: ०२२-२५१३६३०३
क्र.राप / काअमुं / ईनिविदा / ७४ — दिनांकः २१.०४.२०२६

**ई-निविदा सुचना क्रमांक ०१ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, रा.प. मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई ८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे खालील कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदा मागवित आहेत.

| ई-ID क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| १२९६८५६_१ | रा.प. मुंबई विभागातील कुर्ला नेहरु नगर आगारात ई बसेससाठी सबस्टेशन खोलीचे बांधकाम करणे. | १६१०५४२.०० |
| १२९६८५६_२ | रा.प. सिंधुदुर्ग विभागातील कुडाळ आगारात विशेष दुरुस्ती करणे. (जुने सिमेंट पत्रे काढुन नवीन मेटाकुलर शिट बसविणे) | १६०७३४७.०० |
| १२९६८५६_३ | रा.प. रत्नागिरी विभागातील चिपळुन आगारात दोन गाळ्यांनी विस्तार करणे. (पाचवी मागणी) | १६९४६१७.०० |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | २३/०४/२०२६ | १०.०० |
| २. | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | ०२/०५/२०२६ | १६.०० |
| ३. | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | ०४/०५/२०२६ | १०.०० |

टीपः- १. सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. २. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

कार्यकारी अभियंता
रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)

**नवी मुंबई महानगरपालिका**

शहर अभियंता विभाग
निविदा सुचना क्र./श.अ/18/2026-27

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | ऐरोली विभागातील स्वामी विवेकानंद स्कुल गवतेवाडी परिसरातील गटर व पदपथाची सुधारणा करणे. | रु.5810814/- |
| 2 | ऐरोली विभागातील चिंचपाडा प्र.क्र.8 येथील लक्ष्मी चाळ व लहुजी वस्ताद चाळ परिसरातील गटार व पदपथाची सुधारणा करणे. | रु.6795372/- |
| 3 | ऐरोली विभागातील सेक्टर 10 येथील फ्लेमिंगो पार्कजवळील गटार व पदपथाची सुधारणा करणे. | रु.6075384/- |

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि. 23 /04/2026 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेला आहे. सही/-

(शिरीष आरदवाड)
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/310/2026

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**ई निविदा सूचना क्रमांक ०९/२०२६- २०२७ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | बारवी पाणीपुरवठा योजना (ठेव अंशदान काम)... मुंबई रेल्वे विकास महामंडळ लि. अंबरनाथ यांच्या मार्फत बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित उड्डाणपुलावर बारवी गुरुत्व वाहिनी क्र. २ व ३ ची पुनर्रचना करणे. | ₹ ६,१२,२२,२३६.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २२/०४/२०२६ ते दिनांक २९/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामांबाबत दिनांक २३/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा दिनांक २४/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

खातेः प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)
**No. E.E.Mech./EI/ 501/Maint dtd. 23.04.2026**
**ई-निविदा सुचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे खालील नमुद विषयांकित कामांसाठी, इच्छुक निविदाकारांकडुन ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा वितरण व विक्री दिनांक आणि वेळ, निविदा विक्री नियत दिनांक आणि वेळ या बाबतचा तपशीलवार महाराष्ट्र सरकारची ई-प्रोक्योरमेंट सिस्टम महाटेंडर्स/ बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट वर निविदा अवलोकन अंतर्गत प्रसिद्ध/ अपलोड करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | निविदेचा विषय |
|---|---|---|
| १. | २०२६_MCGM_१२९७१५५_१ | महानगरपालिकेच्या विविध परिसरात/ रुग्णालयात आणि शाळांमधील २३ नग उद्वाहनांचे ०३ वर्षांच्या कालावधीकरिता सर्वसमावेशक सेवा आणि परिरक्षणाचे कंत्राट. (कालावधी ०१.०९.२०२६ ते ३१.०८.२०२९). |

इच्छुक निविदाकारानी तपशीलवार माहितीकरिता महाराष्ट्र सरकारची ई-प्रोक्योरमेंट सिस्टम (महाटेंडर्स) (http://mahatenders.gov.in)/ बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर भेट द्यावी.

सही/-
पीआरओ/१५४/जाहि./२०२६-२७ — कार्यकारी अभियंता यां. (वि.स.) परि

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

## 'आरवरी सवाल' ठरणार 'पहिला'



राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक अभिजित मोहन वारंग दिग्दर्शित 'आरवरी सवाल' हा चित्रपट एका विशेष कारणामुळे भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात नोंदवला जाणार आहे. येत्या ८ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणारा हा चित्रपट भारतीय सांकेतिक भाषेत (इंडियन साईन लँग्वेज) उपलब्ध असणारा पहिला हिंदी चित्रपट ठरणार आहे. चित्रपट निर्मात्यांनी हा धाडसी निर्णय घेऊन चित्रपट पाहण्याचा अनुभव सर्वांसाठी सुलभ केला आहे. भारतात सुमारे ४ ते ५ कोटी नागरिक श्रवणदोष किंवा दृष्टीदोष असलेले आहेत. या मोठ्या प्रेक्षकवर्गापर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांना चित्रपटगृहात मुख्य प्रवाहातील सिनेमाचा आनंद घेता यावा, यासाठी हा चित्रपट पहिल्या दिवसापासूनच सांकेतिक भाषेत प्रदर्शित केला जाणार आहे. अभिनेता संजय दत्त याची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाने घोषणेपासूनच प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण केली आहे. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद उत्कर्ष नैथानी यांनी लिहिले आहेत.

## अहानचा 'सनकी'



अभिनेता अहान शेट्टी याने आपल्या आगामी चित्रपटासाठी 'सनकी' हे शीर्षक निश्चित केले असून, यासाठी त्याने थेट निर्माता साजिद नाडियाडवाला यांच्याशी संवाद साधला. टीनू देसाई यांच्या दिग्दर्शनाखाली आकाराला येणाऱ्या या प्रकल्पासाठी हे शीर्षक मिळवण्यात अहानला यश आले आहे.

चित्रपटसृष्टीत सहसा चित्रपटांची शीर्षके औपचारिक प्रक्रिया आणि वाटाघाटींद्वारे निश्चित केली जातात. मात्र, अहानने या प्रकरणासाठी वैयक्तिकरित्या साजिद यांची भेट घेतली. साजिद यांनी यापूर्वी एका वेगळ्या प्रकल्पासाठी हे शीर्षक राखून ठेवले होते. अहानची विनंती आणि शेट्टी कुटुंबाशी असलेले जुने ऋणानुबंध लक्षात घेऊन नाडियाडवाला यांनी कोणताही विलंब न लावता हे नाव अहानच्या चित्रपटासाठी देण्यास संमती दिली.

'सनकी' हे शीर्षक प्रेक्षकांच्या चटकन लक्षात राहणारे आणि व्यावसायिकदृष्ट्या फायदेशीर ठरेल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. अहानसारख्या तरुण अभिनेत्यासाठी चित्रपटाच्या सुरुवातीच्या प्रसिद्धीकरिता अशा प्रकारची शीर्षके महत्त्वाची ठरतात.

## आमिरसोबत झळकणार श्रद्धा



'भारत पे'चे सह-संस्थापक आणि प्रसिद्ध उद्योजक अशनीर ग्रोव्हर यांच्या आयुष्यावर आधारित बायोपिकची सध्या मनोरंजन विश्वात जोरदार चर्चा आहे. ताज्या वृत्तानुसार, या चित्रपटात आमिर खान मुख्य भूमिकेत दिसणार असून, त्याच्या पत्नीची म्हणजेच माधुरी जैन ग्रोव्हर यांची भूमिका अभिनेत्री श्रद्धा कपूर साकारणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन राहुल मोदी करत असून, त्यांनी गेल्या तीन वर्षांपासून या चित्रपटाच्या पटकथेवर काम केले आहे. राहुल मोदी यांनी यापूर्वी 'सोनू के टीटू की स्वीटी' सारख्या चित्रपटांसाठी लेखक म्हणून काम केले आहे. श्रद्धा कपूर या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळापासूनच याच्याशी जोडली गेली असून तिने पटकथेचा विकास जवळून पाहिला आहे.

६१ वर्षीय आमिर खान आणि ३९ वर्षीय श्रद्धा कपूर ही जोडी पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र येणार आहे. आमिर खानने यापूर्वीच या चित्रपटाच्या कथेला पसंती दर्शवली असून, सध्या हा चित्रपट प्री-प्रॉडक्शन टप्प्यावर आहे. अद्याप या चित्रपटाची अधिकृत घोषणा निर्मात्यांकडून होणे बाकी आहे.

## विक्रम भट्ट यांनी बदलले चित्रपटाचे नाव



दिग्दर्शक विक्रम भट्ट आपल्या आगामी हॉरर चित्रपटामुळे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. २०११ मध्ये आलेल्या 'हॉंटेड ३डी' या गाजलेल्या चित्रपटाच्या फ्रँचायझीमधील पुढील चित्रपट आता १२ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. मात्र, या चित्रपटाच्या नावात ऐनवेळी बदल करण्यात आला असून, 'हॉंटेड - घोस्ट्स ऑफ द पास्ट' ऐवजी आता 'हॉंटेड - इकोज ऑफ द पास्ट' असे नाव निश्चित करण्यात आले आहे.

विक्रम भट्ट यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत हा बदल का केला, याचे रंजक कारण स्पष्ट केले. ते म्हणाले की, चित्रपटाला सतत विलंब होत होता आणि त्याच काळात त्यांना काही वैयक्तिक कायदेशीर समस्यांना सामोरे जावे लागले होते. त्यांच्या एका जवळच्या मित्राने असा सल्ला दिला की, चित्रपटाच्या शीर्षकामध्ये 'घोस्ट' शब्द असल्यामुळे कदाचित हे अडथळे येत आहेत.

## रामायणाबद्दलची टिप्पणी भोवली



ज्येष्ठ अभिनेते प्रकाश राज यांच्या विरोधात आंध्र प्रदेशातील भाजप नेते आणि तिरुमला तिरुपती देवस्थान मंडळाचे सदस्य भानू प्रकाश यांनी कायदेशीर तक्रार दाखल केली आहे. रामायणाचे चुकीच्या पद्धतीने सादरीकरण केल्याचा आणि हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.

हा वाद जानेवारीमध्ये झालेल्या 'केरळ लिटरेचर फेस्टिव्हल' मधील प्रकाश राज यांच्या एका विधानामुळे सुरु झाला. एका सत्रात बोलताना प्रकाश राज यांनी मुलांच्या एका नाटकाचा संदर्भ दिला होता. या नाटकात राम, लक्ष्मण, रावण आणि शूर्पणखा या पात्रांना आधुनिक आणि उपरोधिक स्वरूपात मांडण्यात आले होते. प्रकाश राज यांनी या नाटकाचे वर्णन करताना म्हटले होते की, राम आणि लक्ष्मण हे 'उत्तर भारतीय स्थलांतरित मजूर' असून त्यांनी रावणाच्या बागेतून फळे चोरली होती. तसेच शूर्पणखेने फळांच्या बदल्यात 'जीएसटीसह पैसे' मागितले. या विधानाचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर टीका सुरू झाली. भानू प्रकाश यांनी प्रकाश राज यांच्या विधानांना मानहानीकारक आणि द्वेषपूर्ण म्हटले आहे. यामुळे जातीय सलोखा बिघडू शकतो, असा दावा करत त्यांनी राज यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांनी १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा ठोकण्याचा इशाराही दिला आहे. १६ एप्रिल रोजी वकील अमिता सचदेवा यांनीही स्वतंत्र तक्रार दाखल केली. यात त्यांनी प्रकाश राज यांनी जाणीवपूर्वक हिंदू देवतांचा आणि सनातन धर्माचा अपमान केल्याचा आरोप केला आहे.

## डेव्हिड धवनांचे निवृत्तीचे संकेत



भारतीय चित्रपटसृष्टीतील 'कॉमेडी किंग' म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ दिग्दर्शक डेव्हिड धवन यांनी आपल्या निवृत्तीचे संकेत दिले आहेत. आगामी 'है जवानी तो इश्क होना है' हा चित्रपट आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीतील शेवटचा चित्रपट असू शकतो, असे विधान त्यांनी केल्याने मनोरंजन विश्वात चर्चांना उधाण आले आहे. एका मुलाखतीदरम्यान आपल्या प्रवासाचा आढावा घेताना धवन म्हणाले की, आता यापुढे आणखी काम करावे असे वाटत नाही. या चित्रपटानंतर आपण केवळ वरुणचे वडील म्हणून राहणे पसंत करू, असे सूचक विधान त्यांनी केले. या निर्णयामागे आरोग्याची कारणे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान त्यांची प्रकृती खालावली होती, त्यावेळी वरुणने त्यांची पूर्ण काळजी घेतली.

जुन्या काळातील आठवणींना उजाळा देताना त्यांनी सांगितले की, पूर्वीचे चित्रपट हे केवळ विश्वासावर बनवले जात असत. सलमान खान, गोविंदा किंवा संजय दत्त यांसारख्या कलाकारांनी अनेकदा पूर्ण पटकथा न ऐकता केवळ प्रसंगांच्या वर्णनावर काम केले होते. या मुलाखतीत डेव्हिड धवन यांनी आपल्या मुलाच्या कामातील प्रगतीचे विशेष कौतुक केले. 'बॉर्डर २' मधील वरुणचा अभिनय उत्कृष्ट असल्याचे सांगतानाच, त्याच्यातील भावनिक प्रगल्भतेचाही त्यांनी गौरव केला.

## कोल्हापुरात कर्जाच्या वसुलीसाठी महिलेवर तीन वर्षे अत्याचार

■ कोल्हापूर

**कर्ज** दिलेल्या पैशांच्या मोबदल्यात महिलेला शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडल्याचा गंभीर प्रकार कोल्हापुरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी गांधीनगर पोलीस ठाणे येथे आरोपी अमित सावंत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, ती एका सामाजिक संस्थेत आरोग्य सल्लागार म्हणून कार्यरत आहे. २०२३ मध्ये आर्थिक अडचणींमुळे तिने आरोपीकडून १० टक्के व्याजाने दोन लाख रुपये उधार घेतले होते. सुरुवातीला काही महिने तिने व्याजाची परतफेड केली. पण आर्थिक अडचणी वाढल्यानंतर आरोपीने तिच्यावर दबाव टाकण्यास सुरुवात केली.आरोपीने महिलेला धमकावून तिचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ काढल्याचा आरोप आहे. या व्हिडिओंच्या आधारे ब्लॅकमेल करत सुमारे तीन वर्षे तिला वारंवार अत्याचारास भाग पाडण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

आरोपी तिला हॉटेलमध्ये तसेच वाहनात नेऊन जबरदस्ती करत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.पीडितेने नोव्हेंबर २०२५ पर्यंत व्याजासह सुमारे २ लाख १० हजार रुपये परत केले होते. तरीही उर्वरित रकमेसाठी आरोपी धमकी देत होता.

## एमआयडीसी-कॉस्मे कराराने राज्यात कोरियन गुंतवणुकीला चालना मिळणार



■ मुंबई

**महाराष्ट्र** मध्ये कोरियन उद्योगांचा वाढता कल लक्षात घेऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि कोरिया लघु, मध्यम व नवउद्योजक प्रोत्साहन संस्था यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला. नवी दिल्ली येथे २० एप्रिल २०२६ रोजी हा करार करण्यात आला. या करारामुळे महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक, कौशल्यविकास आणि आधुनिक तंत्रज्ञान सहकार्याला मोठी चालना मिळणार आहे.

महाराष्ट्रातील औद्योगिक संधी, गुंतवणूक सुलभता, कौशल्यविकास आणि तांत्रिक सहकार्य या विषयांवर पुणे येथे नुकतीच उच्चस्तरीय बैठक पार पडली होती. त्या चर्चेचा पुढील टप्पा म्हणून हा करार आकाराला सांगितले. या वेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, सहमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, महाव्यवस्थापक डॉ. विकास सूर्यवंशी तसेच कोरियन संस्थेचे उपाध्यक्ष जँग ह्युंग पार्क आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.या कराराचा उद्देश कोरियन उद्योगांना महाराष्ट्र मध्ये गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणे आणि विद्यमान उद्योगांच्या विस्ताराला चालना देणे हा आहे. पहिल्या टप्प्यात गुंतवणूक संधी, जमीन व पायाभूत सुविधांची माहिती दिली जाईल.

## सत्ताधाऱ्यांनी विरोधकांविरूद्ध काढलेला जगातील पहिला मोर्चा



■ मुंबई

### संजय राऊतांची मिश्किल टिप्पणी

**संसदेत** महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्याच्या निषेधार्थ काल मुंबईत भाजपाने काढलेल्या मोर्चावर उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी शेलक्या शब्दात टीका केली. सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षांच्या विरोधात काढलेला जगाच्या इतिहासातील हा पहिला मोर्चा असावा,अशी मिश्किल टिप्पणी राऊत यांनी केली.

केंद्रात सत्ता भाजपाची , राज्यात सत्ता भाजपाची , विरोधी पक्षांसह सर्व सहमतीने विधेयक २०२३ मध्ये पारीत झाले आहे,असे असताना सरकारला महिला आरक्षण लागू करायचे नाही आणि खापर विरोधकांच्या डोक्यावर फोडायचे आहे. म्हणूनच भाजपाने काल मोर्चा काढला. हा मोर्चा म्हणजे सत्ताधाऱ्यांनी विरोध पक्षांच्या विरोधात काढलेला जगाच्या इतिहासातील पहिला मोर्चा असेल,असे राऊत म्हणाले.

मतदारसंघांची फेररचना करून खासदारांची संख्या ८५० करण्याचा आग्रह धरणारा भाजपाच खरा महिला आरक्षणाचा शत्रू आहे,असा दावाही राऊत यांनी केला.

## आणिक व मुलुंडमध्ये श्वान निवारागृहे

■ मुंबई

### आरक्षणात बदल

**भटक्या** श्वानांच्या वाढत्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने आणिक आणि मुलुंड येथील काही भूखंडांच्या आरक्षणात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. एम/पूर्व विभागातील आणिक येथील रुग्णालयासाठी राखीव भूखंड तसेच टी विभागातील मुलुंडमधील घनकचरा व्यवस्थापनासाठी राखीव जागा वगळून त्या ठिकाणी श्वान निवारागृह आणि निर्बिजीकरण केंद्र उभारले जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या ७ नोव्हेंबर २०२५ च्या निर्देशांनुसार सार्वजनिक ठिकाणांजवळील भटक्या श्वानांची नसबंदी करून त्यांना निवारागृहात ठेवण्याचे आदेश आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने योग्य जागांचा शोध घेत हा निर्णय घेतला आहे. आणिक येथे सुमारे ८४११ चौ. मी. जागा श्वान निवारागृहासाठी उपलब्ध करण्यात आली असून, मुलुंड (पूर्व) येथे आधीपासून सुरू असलेल्या निर्बिजीकरण केंद्रासोबतच सुमारे ३००० चौ. मी. क्षेत्रावर नवे निवारागृह उभारले जाणार आहे. हा प्रकल्प महानगरपालिकेमार्फत किंवा सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारण्याचा विचार असून, यामुळे भटक्या श्वानांचे व्यवस्थापन आणि नागरिकांची सुरक्षितता सुधारण्यास मदत होणार आहे.



नायगाव पोलीस मैदानात १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त होणाऱ्या परेडचा सराव करताना (छाया: दीपक साळवी)

## साताऱ्यात आयटी पार्कसाठी एमआयडीसीला ४२.५५ हेक्टर जमीन

■ मुंबई

**सातारा** जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा महत्त्वाचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. मौजे नागेवाडी येथे आयटी पार्क उभारण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) ला ४२.५५ हेक्टर जमीन देण्याच्या प्रस्तावाला आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे सातारा आणि परिसरातील आयटी क्षेत्राला मोठी गती मिळण्याची अपेक्षा आहे. विशेषतः स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार असून, उद्योजकतेलाही प्रोत्साहन मिळणार आहे. राज्याच्या औद्योगिक नकाशावर साताऱ्याचे स्थान अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. आयटी पार्कमुळे गुंतवणूक वाढण्यास मदत होईल तसेच आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योगांना चालना मिळेल

## वसईकरांवर पालिकेने लादले दोन नवीन कर!

■ वसई

### नागरिकांमध्ये संताप

**वसई-विरार** महापालिकेने यंदा पाणीपुरवठा लाभ कर आणि मलप्रवाह सुविधा कर असे दोन नवीन कर लागू केले आहेत. वसईच्या ग्रामीण भागात तर सूर्या योजनेचे पाणी मिळालेले नाही आणि सांडपाणी प्रकल्पही कार्यान्वित नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप पसरला आहे.

मागील वर्षी प्रशासकीय काळात तत्कालीन आयुक्तांनी करवाढ सुचवली होती. तेव्हा सर्वच राजकीय पक्षांनी विरोध केला होता. त्यामुळे करवाढ झाली नव्हती. दरम्यान, माजी आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी ३० डिसेंबर २०२५ रोजी निवासी मालमत्ता ५ टक्के, व्यावसायिक ७ टक्के करवाढीचा प्रस्ताव मंजूर केला. त्यामुळे १ एप्रिल पासून पाणीपट्टी लाभकर आणि मलनि:सारण असे दोन नवीन कर लागू करण्यात आले आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करांच्या देयकांचे वाटप झाल्यानंतर या दोन नव्या करांची माहिती समोर आली. या करवाढीला सर्वच स्तरातून विरोध होत आहे.

वसई पश्चिमेच्या ग्रामीण भागात अद्याप सूर्या योजनेचे पाणी आलेले नाही. तेथे सांडपाणी प्रकल्प कार्यान्वित नाही. तरी देखील कर आकारणी करण्यात आली आहे, हे अन्यायकारक आहे, असे राजोडी गावातील साल्विन रोझारियो यांनी सांगितले. आम आदमी पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष जॉन परेरा यांनी देखील ही लूट असल्याचे सांगितले.

## सात आदर्श महाविद्यालयांच्या शिक्षकांना युजीसीनुसार वेतन लागू

■ मुंबई

**मंत्रिमंडळ** बैठकीत राज्यातील आदर्श महाविद्यालयांमध्ये कार्यरत शिक्षकांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, राज्यातील सात आदर्श महाविद्यालयांतील शिक्षकांना आता विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) च्या निर्देशानुसार मूळ वेतन दिले जाणार आहे.

यासोबतच, या शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आगामी पदभरती प्रक्रियेत अतिरिक्त गुण देण्याचाही निर्णय घेतला. त्यामुळे या शिक्षकांना करिअरच्या संधींमध्ये मोठा फायदा होणार आहे. या निर्णयामुळे आदर्श महाविद्यालयांतील शिक्षकांना दिलासा मिळणार आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर हळद फेकून आंदोलन करणार!

■ हिंगोली

**राज्यात** सर्वात जास्त हळद हिंगोली जिल्ह्यात पिकविली जाते. शेतकऱ्यांचे पिवळे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हळदीचे दर कोसळल्याने क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सेनगाव ते गोरेगाव मार्गावर आज दुपारी हळद पेटवून देत शासनाचा निषेध केला. आगामी काळात मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर हळद फेकून आंदोलन केले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.


## स्वातंत्र्यसैनिकांच्या जमिनींच्या हस्तांतरणाचा मार्ग मोकळा

■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळाच्या बैठकीत महसूल विभागाशी संबंधित महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून, भोगवटादार वर्ग-२ मधील जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतर करताना आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्याची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना लवकरच जारी केली जाणार आहे. या निर्णयानुसार, स्वातंत्र्यसैनिकांना दिलेल्या जमिनी त्यांच्या शेतकरी वारसांना वर्ग-१ मध्ये हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा झाला. यामुळे जमीन रुपांतरण प्रक्रिया अधिक सुलभ होणार असून अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

याबाबत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, स्वातंत्र्यसैनिकांना दिलेली जमीन आता त्यांच्या शेतकरी वारसांना हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला.

# नवाकाळ शब्दकोडे-१५८४



**आडवे शब्द –**

१. एक शिकारी पक्षी- बहिरी ××× ३. अग्रलेख ६. आडदांड व्यक्ती ८. हुषारी, चतुराई १०. जून, राठ ११. फुलातील रजःकण १२. खाटकाचा चाकू १३. लहान मुलांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंत १४. बिरबलाच्या वेळी असलेला बादशहा १५. नवरात्रातली पाचवा दिवस १७. हमरस्त्यावरील भोजनगृह १८. मार्गस्थ १९. बाष्प २०. भारत-पाक सीमेवरचे मोठे वाळवंट २२. काशी २४. शांतवन २५. हिशोबाची वही २६. नवनिर्मिती २८. चेष्टा २९. घाऊक ३०. कृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश ३२. काठी ३३. ताजेपणा ३४. कंठ ३६. लुच्चा ३८. वरच्या प्रतीचा, वरच्या दर्जाचा ३९. खोडकर ४०. ज्वारीची उरलेली ताटे ४२. आश्रय ४४. पंखाचा भाग ४६. प्रहर ४८. ज्याची इच्छा बाळगली ते ४९. अस्थी ५०. दूध आटवून केलेला पदार्थ ५२. पृथ्वीवर असलेले वायूचे आवरण ५३. कर्णभूषणाचा प्रकार, लहान मुलगी ५४. पौर्णिमा ५६. चार ओळींची भारदस्त कविता ५८. टिकाव ६०. त्वरेने, रात्र उलटण्यापूर्वी ६१. अपराध ६२. मालक ६५. पूर्वीचे धान्य दळण्यासाठी असलेले दगडी आयुध ६६. मासा ६७. बारीक फोड ६८. दोन बिंदूंमधील सरळ अंतर ६९. तांब्या ७१. धीट, धाडसी ७२. तांबडी झाक ७३. परत ७४. आदर ७६. नदीचा किनारा, तळे ७८. आक्रोश ७९. स्तुती, स्तोत्र ८१. दिनांक ८२. रचणे, मांडामांड करणे ८३. नशीब ८४. दुर्धर संकट ८६. ऐकण्याचे इंद्रिय ८७. घबाड, चीजवस्तू ८८. ताक घुसळून मिळणारे ८९. त्वरा, घाई ९१. आस्था ९३. इंद्रधनुष्यातील एकूण रंग ९४. सहस्रावधी ९७. पुस्तकाचे पृष्ठ ९८. धूपासारखा नैसर्गिक सुगंधी पदार्थ ९९. ढोंगी १०१. अस्वस्थता १०२. वेळ १०३. ख्यालीखुशाली

**उभे शब्द –**

२. शिर्डीचे दैवत ३. जोडलेले, निगडित ४. पलीकडे ५. पिकावर फवारले जाणारे औषध ६. भूमी ७. चेष्टा ८. चल-अचल सृष्टी ९. पायस १०. संत ज्ञानेश्वरांचा थोरला भाऊ ११. अनुज्ञा १२. सन्मार्ग १३. टेकू, सहारा १४. पराचा कावळा करणे, वाढवून सांगणे- ×× च्या सवा करणे १६. लेखी नोंद, करारमदार १८. आवड २१. पैशांचा माज असलेला २३. हाताचा तडाखा २७. 'दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्मसूर्ये पाहो...' (पसायदान) २९. गुद्दा ३१. न वाकणारा ३२. सगळेजण ३४. मोठा धनलाभ ३५. मोठा ३७. वानर ४१. कोवळी फांदी ४२. सारखा ४३. भस्म ४५. वरचढ ४७. ग्लानी, अनुत्साह ५१. घोडा ५३. वार्ता ५४. वारंवार ५५. ठार करणे ५७. हस्तलिखित ५९. मठ्ठ व्यक्ती (हिं.) ६०. नृप ६३. निळे आकाश ६४. कसेबसे, कष्टपूर्वक ७०. हिस्सा ७३. पुणे शहराचे एक जुने नाव ७५. अपत्य ७७. गोष्टी लेखी रचणे ७९. शांतता ८०. कमी करणे ८५. पायाचा खालचा भाग ८६. समय ८८. लोखंड ९०. लाट ९२. अंतःकरण ९३. पेश करणे, समोर आणणे- ××× करणे ९५. विकार ९६. भ्रम ९८. आच, उष्णता ९९. कुरघोडी १००. चांगले नशीब

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १५८३ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. नामाभिधान ४. उत्तानपाद ७. कुटिरोद्योग १०. सुमती ११. वाघ १२. राहुटी १३. दीडदमडीचा १६. झरा १७. लढा १९. नस २०. पत्रकार २२. पदत्याग २४. ललकारी २६. मनीषा २७. झपाट्याने २८. क्षर २९. कमनीय ३२. गुंगी ३३. क्षीण ३५. आजूबाजूला ३८. तमा ४०. डर ४१. धोका ४२. अतुलनीय ४४. कूप ४५. गेरू ४६. साथी ४७. कड ४८. तारू ५०. झोड ५१. क्ष ५२. ताग ५३. जर ५४. दंडा ५६. पळ ५७. तोफ ५९. घरदार ६०. माती ६१. हेलकावा ६३. लांड्यालबाड्या ६६. मंद ६७. कानन ६८. कळस ६९. इतराजी ७३. खोल ७५. चक्षु ७६. नजर ७८. घालमेल ७९. गवा ८१. वर्म ८२. वडील ८४. रामगड ८६. घोडनवरी ८८. धूर ८९. झासा ९०. जाणीव ९२. कडे ९३. वासा ९५. वंदन ९६. ध्यान ९७. रश्मी ९८. स्वामी ९९. डच्चू १००. नरद १०१. खर १०२. बातमीदार १०३. खण

**उभे शब्द :** १. नाममात्र २. माती ३. धाकड ४. उघडीप ५. नष्ट ६. दरारा ७. कुटील ८. रोष ९. गळसरी ११. वाम १३. दीर १४. दर्शनी बाजू १५. चादर १६. झगझगीत १८. ढाल १९. नकार २०. पथिक २१. कामिनी २३. खट्याळ २५. लक्षण ३०. मरतुकडा ३१. ऋजू ३३. क्षीरसागर ३४. ताकापुरती आजी ३५. आयता ३६. बाग ३७. लाकूडतोड्या ३९. मागे ४३. लड ४९. रूपवान ५२. तादात्म्य ५३. जमा ५४. दंतमंजन ५५.फुलका ५८. फल ५९. घड्याळजी ६२. कानउघाडणी ६३. लांब ६४. बाक ६५. ज्ञात ६९. इक्षु ७०. राखुंडी ७१. गरम ७२. प्रमेह ७४. लगड ७५. चर्म ७७. जरासा ८०. वानवा ८१. वरी ८२. वरवंटा ८३. लहानपण ८५. गजानन ८६. घोडेस्वार ८७. वसाहत ८९. झापड ९१. वरद ९४. फालुदा

# मतदार यादी तपासणी सुरू होत आहे

## आधार, पॅन तयार ठेवा | झीनत यांची मुलारवत

पान १ वरून

सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळतात. याशिवाय, काही अडचण आल्यास थेट बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्याशी संपर्क साधण्याची सुविधाही यात उपलब्ध आहे. मात्र, ही माहिती अद्याप सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पूर्णपणे पोहोचलेली नाही. आम्ही या संपूर्ण प्रक्रियेचा सखोल अभ्यास केला असून प्रशिक्षण शिबिरांमधून याबाबत विस्तृत मार्गदर्शन देत आहोत. विशेषतः असद उस्मानी यांनी प्रशिक्षणादरम्यान या ॲपचा वापर कसा करावा, याबाबत सविस्तर माहिती दिली. उदाहरणार्थ, मतदार यादीतील नावांची पुनरावृत्ती (डुप्लिकेशन) कशी दुरुस्त करावी, याची स्पष्ट प्रक्रिया सांगण्यात आली. एखाद्या व्यक्तीचे नाव दोन वेगवेगळ्या ठिकाणी - जसे की एका राज्यात (उदा. उत्तर प्रदेश) आणि मुंबईत दोन्हीकडे नोंदलेले असल्यास, त्यापैकी एक नाव वगळण्यासाठी कोणता फॉर्म भरायचा, याची माहिती ॲपमध्ये दिली आहे.

**एसआयआरची टीम घरी आली आणि ती व्यक्ती घरी नसेल तर त्याची नोंदणी कशी होईल ?**

**झीनत शबरीन-** एसआयआर प्रक्रियेदरम्यान पडताळणीसाठी घरी आले आणि संबंधित व्यक्ती त्यावेळी घरी उपस्थित नसेल, तरीही त्याची नोंदणी होऊ शकते. अशा परिस्थितीत कुटुंबातील सदस्यांनी किंवा संबंधित व्यक्तीने आपल्या बीएलओशी संपर्क साधणे आवश्यक ठरते. यासाठी eci.net ॲपची माहिती असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या ॲपमध्ये आपला मतदार ओळखपत्र क्रमांक टाकून संबंधित बीएलओची माहिती मिळवता येते आणि त्यांच्याशी संपर्कही साधता येतो.

एसआयआर ही एक अत्यंत महत्त्वाची आणि लोकशाही प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. निवडणूक आयोगाच्या दृष्टीने ही प्रक्रिया आवश्यक असली, तरी पूर्वी काही राज्यांमध्ये तिचा चुकीचा वापर झाल्याची उदाहरणे समोर आली आहेत. त्यामुळे यावेळी कोणत्याही निष्पाप मतदाराचे नाव वगळले जाणार नाही, यासाठी आम्ही अधिक खबरदारी घेतली जात असून प्रत्यक्ष मैदानात उतरून काम केले जाणार आहे.

**डिजी लॉकरचा एसआयआर प्रक्रियेत कसा उपयोग होतो?**

**झीनत शबरीन-** डिजी लॉकरमध्ये सर्व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असल्यामुळे कागदपत्रे सादर करणे अधिक सोपे झाले आहे. बीएलओची जबाबदारी ही सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्याची असते. मतदार पडताळणीसाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र क्रमांक आणि मोबाईल नंबर आवश्यक असतात. या माहितीद्वारे पडताळणी अधिक सोपी आणि जलद पद्धतीने पूर्ण होऊ शकते.

**काही लोक भाडेकरू असतात. ते एक वर्ष किंवा अकरा महिन्यांनी घर बदलत राहतात, त्यांचे काय?**

**झीनत शबरीन-** अशा परिस्थितीत सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे संबंधित व्यक्तीची मतदार नोंदणी नेमकी कुठे आहे? एखाद्या व्यक्तीने राहण्याची जागा बदलली असल्यास, त्या नवीन पत्त्यानुसार मतदार नोंदणी अद्ययावत करणे आवश्यक ठरते. जर एखादे कुटुंब सध्या दिलेल्या पत्त्यावर राहत




नसेल, तरीही त्यांची नोंदणी त्या ठिकाणी अस्तित्वात असेल, तर अशा वेळी नावांची पुनरावृत्ती (डुप्लिकेशन) किंवा जुन्या पत्त्यावरील नाव वगळण्याची प्रक्रिया करावी लागते. ही प्रक्रिया ॲपच्या माध्यमातून सहजपणे करता येते. मतदार ओळखपत्र क्रमांकाच्या आधारे नोंदींची तपासणी करून संबंधित नाव कायम ठेवायचे की वगळायचे, याबाबत योग्य निर्णय घेतला जातो.

**या शिबिरानंतर आता काँग्रेस कार्यकर्ते प्रत्यक्ष मैदानावर उतरतील का?**

**झीनत शबरीन-** हो, आमचे सर्व पदाधिकारी प्रत्यक्ष मैदानात उतरतील. विशेषतः ज्या भागांमध्ये 'एसआयआर' प्रक्रियेच्या माध्यमातून अल्पसंख्याक, दलित आणि आदिवासी समाजाला अधिक लक्ष्य केले जाते, अशा भागांवर आम्ही विशेष लक्ष केंद्रित करणार आहोत. ज्या ठिकाणी अडचणी अधिक प्रमाणात निर्माण होतात, त्या भागांमध्ये हेल्पडेस्क उभारले जाणार आहेत. सर्व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून ही व्यवस्था उभी केली जाईल. सध्या राज्यात एसआयआर प्रक्रियेबाबत काही प्रमाणात संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन आमचे कार्यकर्ते प्रत्यक्ष नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना मार्गदर्शन करतील. नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीत नाव नसणे, मृत व्यक्तीचे नाव काढणे, स्थलांतर झाल्यानंतरही नाव राहणे किंवा आडनाव/नावातील फरकामुळे पडताळणीमध्ये अडचणी येणे अशा सर्व समस्यांवर आमची टीम नागरिकांना सोप्या आणि समजण्यासारख्या पद्धतीने मार्गदर्शन करतील. तसेच, आमच्या शिबिरांमधून नागरिकांना थेट नवीन मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती आणि नाव वगळणे या प्रक्रिया पूर्ण करता येणार आहेत. विशेषतः जे नागरिक प्रथमच मतदानासाठी नोंदणी करत आहेत किंवा ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची अद्याप नोंदणी झालेली नाही, त्यांनाही योग्य मार्गदर्शन दिले जाईल. त्याचबरोबर एलओशी संपर्क कसा साधायचा, कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, प्रक्रिया कशी पूर्ण करायची याबाबत लोकांना सविस्तर मदत केली जाईल. यासाठी आमची टीम सतत नागरिकांच्या संपर्कात राहून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम करणार आहे.

**सध्या काही व्हिडिओ व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये डिजिटल पद्धतीने फसवणूक होत असल्याचा दावा केला जातो.**

**झीनत शबरीन-** यासाठी eci.net सारख्या अधिकृत ॲपचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. या ॲपमध्ये मतदाराशी संबंधित सर्व माहिती आणि आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असतात. मतदार ओळखपत्र क्रमांकाच्या आधारे पडताळणी सहज करता येते, त्यामुळे कागदपत्रांची सत्यता तपासणे सोपे होते. जर कोणी बनावट कागदपत्रे सादर केली, तर ती ओळखण्याची जबाबदारी बीएलओ/बीडीओ (अधिकारी) यांची असते. कोणते कागदपत्र वैध आणि कोणते अवैध हे ठरवण्याचा अधिकार त्यांच्याकडे असतो. त्यामुळे खोटी कागदपत्रे सादर केल्यास संबंधितांवर कारवाई होऊ शकते. आमची भूमिका नागरिकांच्या अडचणी सोडवण्याची आहे. एखाद्या व्यक्तीकडे सर्व कागदपत्रे योग्य असूनही त्याचे नाव वगळले जात असेल किंवा अधिकाऱ्यांकडून अर्ज स्वीकारला जात नसेल, अशा वेळी आम्ही पुढाकार घेऊन त्यांना मदत करणार आहोत.

**बीएलओ फोन उचलत नसतील तर तक्रार कशी करावी?**

**झीनत शबरीन-** आम्ही स्वतः ही सध्या हेच समजून घेत आहोत की तक्रार कशी करायची. पण अशा परिस्थितीत नागरिकांनी वारंवार प्रयत्न करूनही संपर्क होत नसेल तर संबंधित निवडणूक कार्यालय, हेल्पडेस्क किंवा अधिकृत तक्रार नोंदणी प्रणालीचा वापर करावा लागतो. बीएलओ हे निवडणूक यंत्रणेच्या अंतर्गत काम करतात, त्यामुळे तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही नोंदवता येते.

**या पडताळणीसाठी लागणारे कागदपत्र मूळ पाहिजे की झेरॉक्स?**

**झीनत शबरीन-** या पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे ही मूळ (ओरिजिनल) स्वरूपात दाखवावी लागतात. झेरॉक्स प्रती पुरेशा ठरत नाहीत. झेरॉक्स कॉपी सामान्यतः स्वतःच्या माहितीसाठी ठेवली जाते, पण पडताळणी प्रक्रियेत ती वैध मानली जात नाही. त्यामुळे संबंधित अधिकारी मागणी केल्यास मूळ कागदपत्रे दाखवणे आवश्यक असते. आजकाल अनेकांकडे कागदपत्रांच्या डिजिटल प्रती मोबाईलमध्ये उपलब्ध असतात. त्या काही ठिकाणी उपयोगी ठरू शकतात, पण अधिकृत पडताळणीसाठी मूळ कागदपत्रांची आवश्यकता राहते. म्हणूनच नागरिकांनी शक्यतो आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे जवळ ठेवावीत आणि पडताळणीच्या वेळी ती सादर करावीत.

**जे परराज्यातून आलेले आहेत, त्यांना एसआयआर प्रक्रिया झाल्यावर हाकलून लावले जाईल का?**

**झीनत शबरीन-** नाही, त्यांना काढून टाकले जाणार नाही. कारण त्यांचे मतदार ओळखपत्र जर येथे वैध असेल, तर ती ग्राह्य धरली जाते. जर एखादी व्यक्ती येथे राहत असेल, तर त्याचे मतदार ओळखपत्रही त्याच ठिकाणचे असते. काही लोकांची नोंद गावात असते, पण ते शहरात राहतात. अशा वेळी मतदानाचा अधिकार हा स्वतंत्र मुद्दा असतो. पण महत्त्वाची गोष्ट अशी की, जर तुम्ही बाहेरच्या राज्यातून आलेले असाल आणि अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात राहत असाल, तरी तुम्हाला यादीतून काढून टाकले जाणार नाही. तुम्ही तुमचे मतदार नोंदणी बदलू शकता. म्हणजेच तुम्ही तुमचे मतदान स्थानांतर करू शकता. त्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया आणि फॉर्म असतो. त्याद्वारे तुम्ही तुमची मतदार नोंदणी नवीन ठिकाणी करू शकता. म्हणून कोणालाही हाकलून लावले जाणार नाही किंवा नाव काढून टाकले जात नाही.

### ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही त्यांनी काय करायचे?

**झीनत शबरीन-** आजच्या घडीला जवळपास सर्वांकडे स्मार्टफोन असतो. शहरात तसेच ग्रामीण भागातही बहुतांश लोकांकडे किमान एक स्मार्टफोन उपलब्ध असतो. eci.net ॲप हे अतिशय सोपे असून ते कोणत्याही स्मार्टफोनमध्ये सहज डाउनलोड करता येते. मात्र ज्यांच्याकडे इंटरनेट सुविधा नाही किंवा अजूनही साधा फोन वापरला जातो, अशा नागरिकांसाठी काही अडचणी निर्माण होऊ शकतात. अशावेळी ते आपल्या कुटुंबातील कोणाकडे स्मार्टफोन असेल तर त्याच्या मदतीने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करू शकतात. तरीही ज्यांना ॲप वापरणे शक्य नाही, त्यांच्यासाठी काँग्रेसकडून हेल्पडेस्कची विशेष व्यवस्था करण्यात येत आहे. येथे त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन व मदत दिली जाईल. बीएलओ देखील घरोघरी जाऊन नागरिकांना मदत करतील आणि प्रक्रिया समजावून सांगतील.

# भाजपाचे राजकारण! सुनेत्रा पवारांसाठी बारामतीला धाव

पान १ वरून

आम्ही एनसीडीसीकडे पुन्हा एकदा प्रस्ताव पाठवू. त्यानंतर आम्हाला कर्ज मंजूर होईल, असा विश्वास आहे. काही नेत्यांना या कर्जवाटपात दिलासा मिळाला आहे. कोल्हापूरमधील श्री भोगावती, दुधगंगा-वेदगंगा आणि तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्यांना कर्ज मंजूर झाले असून वारणा कारखाना विनय कोरे यांचा आहे. सांगलीतील क्रांती अग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड सहकारी साखर कारखान्यालाही कर्ज मंजूर झाले असून हा कारखाना विधान परिषद आमदार अरुण लाड यांच्या कुटुंबाचा आहे. अरुण लाड यांचे चिरंजीव शरद लाड यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून भाजपात प्रवेश केला आहे. याशिवाय अहिल्यानगरमधील मुळा सहकारी साखर कारखाना, साताऱ्यातील शिवेंद्रराजे भोसले यांचा अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना आणि बीडमधील माजी आमदार प्रकाशदादा सोळंके यांचा लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यालाही कर्ज मंजुरी मिळाली आहे.

कर्जाचे प्रस्ताव नामंजूर करताना कारणे देण्यात आली आहेत. संबंधित कारखान्यांचे भागभांडवल कमी असणे, आर्थिक अनियमितता, कारखाना सलग तीन वर्षे तोट्यात असणे, कर्ज परतफेडीचे अत्यल्प प्रमाण, यापूर्वी घेतलेल्या कर्जातून कोणतीही सुधारणा न होणे, तसेच काही कारखाने भाड्याने चालवायला दिले जाणे या बाबींचा अहवालात उल्लेख करण्यात आला आहे. याशिवाय एफआरपीची थकबाकी आणि शासनाचे देणे बाकी असणे, हेही महत्त्वाचे कारण असल्याचे सांगितले जाते. मात्र ही कारणे जवळजवळ सर्वच कर्जबाजारी कारखान्यांना लागू होतात. त्यामुळे मदत देण्याचा निर्णय हा राजकीय दृष्टीनेच होतो. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, जे साखर कारखाने चालू राहू शकतात, नफ्यात येऊ शकतात आणि शेतकऱ्यांना न्याय देऊ शकतात अशाच कारखान्यांना मदत करणे ही सरकारची सुरुवातीपासून भूमिका राहिली आहे. गेल्या ४० वर्षांपासून सरकारने याच धोरणानुसार निर्णय घेतले आहेत. बाजारात कारखान्यांची संख्या जास्त असणे हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर असते. कारण कारखाने कमी झाले तर मक्तेदारी निर्माण होण्याचा धोका असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक पर्याय उपलब्ध राहावेत, स्पर्धा वाढावी आणि त्यांना योग्य दर मिळावा, यासाठीच सरकार अशा प्रकारचे निर्णय घेत असते. अडचणीत असलेल्या कारखान्यांना मदत करणे ही नवीन बाब नाही. यापूर्वीही अनेक वेळा सरकारने अशा कारखान्यांना आर्थिक मदत केली असून हा निर्णयही त्याच धोरणाचा भाग आहे.

# मंत्री महाजनांना महिलेने सुनावले! व्हिडिओ व्हायरल

पान १ वरून

आज माध्यमांसमोर येऊन गिरीश महाजन यांनी मात्र प्रतिक्रिया देत त्या महिलेलाच दोषी ठरवले. ते म्हणाले की, महिलांच्या हितासाठीच कालचा मोर्चा होता. हजारो महिला रस्त्यावर उतरल्या होत्या. मोर्चामुळे वाहतूक कोंडी झाली हे खरे आहे. पण प्रत्येक मोर्चाच्या वेळी असे होतेच. आम्ही मोर्चासाठी रितसर परवानगी घेतली होती. पण त्या महिल्या भयंकर संतापल्या होत्या. वाट्टेल तसे बोलत होत्या. त्यांनी पोलिसांशीदेखील हुज्जत घातली. आम्ही त्यांना समजवण्याचा प्रयत्न केला. आमच्या महिला कार्यकर्त्याही संतापल्या होत्या. पण आम्ही त्यांना शांत रहायला सांगितले. त्यांना त्रास सहन करावा लागला हे मान्य आहे. पण म्हणून अशा असंसदीय भाषेत बोलणे योग्य नाही. त्यांना आपले म्हणणे दुसऱ्या शब्दात मांडता आले असते. पण रागाच्या भरात त्यांना भान राहिले नाही. यापुढे आम्ही काळजी घेऊ. त्यांनी पोलिसांत तक्रार करायला हवी होती, पण त्यांनी इथे अयोग्य वर्तणूक केली.

# खरातच्या व्यवहाराशी संबंध नाही पत्नी कल्पनाचा न्यायालयात दावा

पान १ वरून

वकिलांनी केला. याशिवाय फिर्यादीने जमीन व्यवहारानंतर जवळपास एक वर्ष कोणतीही तक्रार दाखल केली नव्हती. मात्र, अशोक खरात यांच्यावर गुन्हे दाखल झाल्यानंतरच तक्रार करण्यात आल्याचेही बचाव पक्षाने सांगितले. या आधारे कल्पना खरात यांना अटकपूर्व जामीन देण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान,आज पोलीस अशोक खरात याची चौकशी करत असताना अचानक त्याची प्रकृती बिघडल्याने त्यांना वैद्यकीय उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्याला डोकेदुखी, मळमळ आणि छातीत दुखत असल्याची तक्रार खरातने केली. खरात याच्यासाठी तात्काळ कार्डियाक ॲम्ब्युलन्स बोलावून त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांच्या वकिलांनी यापूर्वी न्यायालयात वैद्यकीय तपासणीसाठी न्यूरोसर्जनकडे नेण्याची मागणी केली होती. दरम्यान, त्यांच्या प्रकृतीत अचानक बिघाड झाल्याने या प्रकरणात विविध चर्चांना उधाण आले आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ठाणे विभाग-२, ठाणे**

म.रा.वि.वि.कं.मर्यादित, ठाणे -२ विभागा अंतर्गत पॉवर हाऊस (O&M) उपविभागात ॲक्युचेक मीटरद्वारे नॉन स्मार्ट १-फेज ऊर्जा मीटरची तपासणी, डेटा डाऊनलोड करणे, नोंदी करणे, विवरणाची छपाई करुन घेण्याबाबत निविदा मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | निविदा क्र | कामाचा तपशील | निविदा रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| १. | EE/THN-2/E-Tender/ ACCU T-05/ 2026-27 | Work of checking/ Testing of non smart 1-Phase Energy meter by Accucheck meter with corresponding data downloading, record generation and Printing of statement of abstract as per same format under O&M Sub Division in Thane-2 Division Thane Circle | १,००,०००/- |

सदर निविदा दि.२२/०४/२०२६ ते २९/०४/२०२६ या कालावधीत Online प्रकारे etender.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील. निविदा भरण्याची अंतिम दि. २९/०४/२०२६ (०२:०० वा) राहील. निविदा भरताना निविदा शुल्क व अनामत रक्कम भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे. सदर निविदा दिनांक २९/०४/२०२६ (४:०० वाजता) उघडण्यात येतील.

संपर्क : अतिरिक्त कार्यकारी अभियंता, ठाणे विभाग-२, ठाणे दूरध्वनी क्रमांक - ९९३०२६९७०२.

कार्यकारी अभियंता, ठाणे -२ विभाग

## कोल्हापूरच्या मातीत आढळली नवी 'दारकरी कोळी' प्रजाती

**कोल्हापूर-** निसर्गसंपन्न कोल्हापूर परिसरात संशोधकांनी 'ट्रॅपडोअर' प्रकारच्या कोळ्याची एक दुर्मीळ नवी प्रजाती शोधून काढली आहे. स्थानिक भाषेत 'दारकरी कोळी' म्हणून ओळखणाऱ्या या कोळ्याचे 'टायटॅनिडिओप्स कोल्हापुरेन्सिस' असे नामकरण केले आहे. शिवाजी विद्यापीठातील संशोधक आणि ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हा शोध लावण्यात आला आहे. त्याचा सर्व तपशील आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'जर्नल ऑफ नॅचरल हिस्ट्री'मध्ये प्रसिद्ध झाला आहे. हे कोळी जमिनीत


ट्रॅपडोर स्पायडर

सुमारे १०० सेंटिमीटर किंवा त्याहून अधिक खोल बीळ तयार करतात. त्याला माती, लाळ आणि कोळ्याच्या जाळ्यापासून बनवलेले घट्ट झाकण म्हणजेच 'दार' असते. हे दार जमिनीशी मिळतेजुळते असते. ते मानवी डोळ्यांना सहज दिसत नाही. यामुळेच त्याला 'दारकरी' असे म्हटले जाते. याची दृष्टी मर्यादित असली तरी अंगावरील केस आणि संवेदना अत्यंत तीव्र असतात. जमिनीवरील सूक्ष्म कंपने ओळखून तो अंधारातही अचूक शिकार करतो. भक्ष्य दाराजवळ येताच क्षणात बाहेर येऊन त्याला पकडतो व पुन्हा बिळात जाऊन दार लावून घेतो.

## गिरीष महाजन यांना अडवणारी महिला

**वरळीमध्ये एका महिलेने भाजपाच्या महिला आरक्षण बिल रॅलीचा फज्जा उडवला. ही महिला एक तासापेक्षा जास्त वेळ ट्रॅफिकमध्ये अडकून होती. तिने पायी चालत पुढे येऊन भाजपाचे मंत्री गिरीश महाजन आणि त्यांच्या इतर सहकारी मंत्री नेते आणि महिला नेत्यांना खडे बोल सुनावले.**

**ती महिला** सुशिक्षित आहे, पेहराव पाहून आणि गाडी यावरून ती उच्चभ्रू वर्गातील आहे हे स्पष्ट आहे. शिवाय ती इंग्रजी शिवाय इतर काही बोलत नव्हती.

मुद्दा हा की, महिला म्हणाली की, तिकडे मैदान आहे तुम्ही तिकडे जाऊन प्रोटेस्ट करा काही अडचण नाही, तुम्ही ट्रॅफिक का अडवले आहे?



यामुळे मंत्र्यांचा तसेच भाजपाच्या इतर नेते महिला, अशा सर्वांचा नाईलाज होताना दिसत होता, कुणालाही तिच्यासोबत इंग्रजीत बोलता येत नसल्याचे दिसून आले. अर्थात ती भाषा यायलाच पाहिजे असं काही नाही.

सगळे फक्त हाताने आणि मानेने तिला शांत व्हा, जातो जातो म्हणत होते. महिला अधिक चिडत होती. यात महत्त्वाचा

तिला आपल्या मुलाला पीकअप करायला जायचं होतं. कदाचित या महिलेला माहिती असेल आणि असावं. कारण ती सुशिक्षित आहे तर महिला आरक्षण बिलच्या संदर्भातील जे काही प्रहसन नाट्य सुरू आहे ते तिला लक्षात आले असावे.

तेव्हा एक पोलीस अधिकारी या महिलेवर ओरडताना दिसून येत होते, त्यांनाही इंग्रजी येत नव्हते, ते हिंदीत बोलत होते आणि सतत महिला पोलीस असं कुणीतरी बोलत आहे. जर ही महिला मराठी असती, गरीब असती शेतकरी कुटुंबातील असती तर पोलिसांनी तिला तिथेच झोडपून काढले असते का? हा प्रश्न मला सतावतो आहे.

जेव्हा व्हिडिओ पाहिला, आणि अनेक दलित मोर्चे,

**मिलिंद धुमाळे**

स्त्रीवादी संघटनांचे मोर्चे आणि अंतरवाली सराटी सगळे आठवत होते. त्या पोलीस अधिकाऱ्यांचे वागणे मला आवडले नाही. ज्याप्रकारे त्यांनी महिलेला हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला होता. ते अगोदर म्हणाले तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे. खरंतर ती महिला त्यांच्या समोरच हे सर्व करत होती, ओरडत होती, पण आपल्याकडे अशीच पद्धत आहे ना. अगोदर दम द्यायचा, दमात घ्यायचे, मग झोपडून काढायचे. एक सुशिक्षित नागरिक म्हणून आपण असा देश बनवला आहे हे पाहून वाईट वाटते.

**वरळी** येथे अलीकडे घडलेली एक घटना जिथे एका महिलेने महिला आरक्षण (म्हणजे technically Delimitation Bill) विधेयकाच्या समर्थनार्थ आयोजित राजकीय रॅलीमुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीविरोधात तीव्र आक्षेप नोंदवला. पण ही केवळ एक व्हायरल व्हिडिओपुरती मर्यादित बाब नाही. ती राज्य, नागरिक आणि कायद्याच्या अंमलबजावणी यंत्रणेतील परस्पर संबंधांवर गंभीर प्रश्न उपस्थित करते.

घटनेतील महत्त्वाचा मुद्दा असा की, संबंधित महिला एका तासाहून अधिक काळ ट्रॅफिकमध्ये अडकलेली होती. तिची प्राथमिक हरकत साधी आणि न्याय्य होती. सार्वजनिक रस्ते अडवून आंदोलन करण्याऐवजी, अशा प्रकारचे निदर्शने निश्चित जागांवर का होत नाहीत? हे केवळ वैयक्तिक अस्वस्थतेचे प्रकटीकरण नसून, Right to Mobility आणि Right to Life under Article २१ यांच्याशी निगडित प्रश्न आहे.

यामध्ये दुसरा ठळक पैलू म्हणजे सत्ताधाऱ्यांची आणि पोलिसांची प्रतिक्रिया. संवादाऐवजी हातवारे, शांत करण्याचे प्रयत्न आणि शेवटी पोलिसांकडून उग्र भाषेत हस्तक्षेप हे सर्व एक प्रकारचे institutional discomfort दर्शवते. नागरिकांच्या वैध प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी त्यांना नियंत्रणात ठेवण्याची प्रवृत्ती, ही लोकशाही व्यवस्थेत चिंताजनक आहे.

आणि म्हणूनच, त्या महिलेचा आवाज हा केवळ individual inconvenience नसून, तो systemic exclusion कडे निर्देश करणारा आहे, जिथे धोरणे स्त्रियांसाठी बनवली जातात, पण स्त्रियांच्या प्रत्यक्ष गरजा आणि वास्तव दुर्लक्षित राहतात.

भाषेचा मुद्दा देखील येथे दुर्लक्षित करता येणार नाही. संबंधित महिला इंग्रजीत संवाद साधत होती, तर समोरचे अधिकारी प्रामुख्याने हिंदी/मराठीत. (इंग्रजी यायलाच पाहिजे हा माझा अट्टाहास नाहीच.)

संवादातील हा तुटवडा केवळ भाषिक नव्हता, तर तो power imbalance आणि administrative unpreparedness चे द्योतक ठरतो. राज्याच्या प्रतिनिधींना नागरिकांशी प्रभावी संवाद साधता न येणे, ही देखील प्रशासनातील त्रुटीच मानावी लागेल.

परंतु सर्वात महत्त्वाचा आणि अस्वस्थ करणारा प्रश्न असा आहे, जर हीच महिला सामाजिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीतील असती, तर राज्ययंत्रणेची प्रतिक्रिया अशीच संयमित राहिली असती का?

भारतातील आंदोलनांवरील पोलिसी प्रतिसादाचा इतिहास पाहता, हा प्रश्न केवळ काल्पनिक नाही. विविध दलित आंदोलनं, स्त्रीवादी मोर्चे किंवा ग्रामीण

**ॲड. परिक्रमा, पुणे**

भागातील आंदोलनांमध्ये वापरली जाणारी शक्ती आणि शहरातील उच्चवर्गीय व्यक्तींविषयी दाखवला जाणारा संयम या दोन टोकांमधील तफावत स्पष्ट आहे. हे equality before law (Article 14) या आपल्या गप्पांचे व अंमलबजावणीतील वास्तव अंतर highlight करते.

शेवटी, ही घटना आपल्याला आठवण करून देते की, लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. ती दररोजच्या सार्वजनिक व्यवहारात, रस्त्यावर, संवादात आणि राज्याच्या प्रतिसादात दिसून येते.

नागरिकांचा आवाज, तो कोणत्याही भाषेत, कोणत्याही वर्गातून येवो, हा ऐकला जाणे आणि सन्मानाने हाताळला जाणे, हीच खरी constitutional morality आहे.

## मालेगाव स्फोटातील ४ आरोपी निर्दोष खटला हायकोर्टाने बंद केला

■ मुंबई

२००६ **मधील** मालेगाव स्फोट प्रकरणातील चार आरोपींविरोधातील खटला मुंबई उच्च न्यायालयाने बंद केला आहे. आरोपी राजेंद्र चौधरी, धन सिंह, मनोहर राम सिंह नरवारिया आणि लोकेश शर्मा यांच्या विरोधातील खटला आज न्यायालयाने संपुष्टात आणला आणि त्यांना निर्दोष ठरविले.

विशेष न्यायालयाने सप्टेंबर २०२५ मध्ये दिलेला आरोप निश्चितीचा आदेश रद्द केला. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्या. श्याम चांडक यांच्या खंडपीठाने आरोपींनी दाखल केलेल्या अपिलावर हा निर्णय दिला. उच्च न्यायालयात

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

सुनावणीदरम्यान आरोपींच्या वकिलांनी दोन प्रमुख मुद्दे मांडले. एनआयए कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सादर करण्यात अपयशी ठरली आणि दुसरे म्हणजे इतर आरोपींना दिलेली मुक्तता दिली होती.

## बागेश्वर बाबांच्या दरबारात माजी सरन्यायाधीश गवई

■ भोपाळ

**मध्य प्रदेशातील** छतरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धाम येथे भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी कुटुंबासह भेट दिली. या भेटीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यामुळे बागेश्वर धाम पुन्हा चर्चेत आले आहे.

'बागेश्वर बाबा' म्हणून ओळखले जाणारे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या दरबाराला देशभरातून भाविकांची मोठी गर्दी होत असते. मात्र आता माजी सरन्यायाधीश गवई यांच्या भेटीमुळे नव्याने चर्चा सुरू झाली आहे. बागेश्वर धामच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावर दिलेल्या माहितीनुसार, गवई यांनी पत्नी तेजस्विनी गवई आणि पुत्र ज्योतिरादित्य गवई यांच्यासह धामला भेट दिली. त्यांनी बागेश्वर बालाजीचे दर्शन घेऊन पूजाअर्चा केली. त्यानंतर त्यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांची भेट घेतली. यावेळी शास्त्री यांनी त्यांना बालाजी भगवानांचे चित्र भेट दिले. दोघांमध्ये सुमारे अर्धा तास आध्यात्मिक विषयांवर चर्चा झाल्याची माहिती आहे.

## शहीद अग्निवीराला पूर्ण लाभ नाकारला आईची हायकोर्टात धाव! केंद्राला नोटीस

■ मुंबई

**जम्मू** आणि कश्मीरमध्ये ऑपरेशन सिंदूर दरम्यान धारातीर्थी पडलेल्या शहीद जवानांच्या कुटुंबियांना पूर्ण लाभ नाकारल्याने शहीद अग्निवीराच्या आईने उच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहेत. नियमित सैनिकांप्रमाणेच लाभ देण्यात यावेत, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. या याचिकेची दखल घेत न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपिठाने केंद्र सरकारला नोटीस बजावत ७ मेपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. तसेच याचिकेची सुनावणी १८ जूनला निश्चित केली.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले. त्या दरम्यान पाकिस्तानी सैन्याकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन केले होते. पाकिस्तानच्या हल्ल्यात ९ मे रोजी पूंछ येथे मुरली नाईक हे शहीद झाले. त्यांच्या मृत्यूनंतरदेखील त्यांना नियमित सैनिकांप्रमाणे लाभ देण्यात न आल्याने मुरली यांच्या मातोश्री ज्योतीबाई नाईक यांनी ॲड. संदेश मोरे, ॲड. हेमंत घाडीगावकर व ॲड. हितेंद्र गांधी यांच्यामार्फत हायकोर्टात याचिका दाखल केली आहे.

अग्निवीर हे नियमित सैनिकांसारखेच कर्तव्य बजावतात आणि त्यांना समान जोखीम सहन करावी लागते. तरीही अग्निवीरांच्या कुटुंबियांना दीर्घकालीन पेन्शन आणि कल्याणकारी लाभ नाकारले जातात.

## चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची आमदार निवास येथे निदर्शने

■ मुंबई

**मुंबईतील** मॅजेस्टिक आमदार निवास येथील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी काल पासूनच राज्यव्यापी आंदोलनात सहभाग घेतला आहे. आज त्यांनी खाली उतरून निदर्शने केली. या संपाचा थेट परिणाम आमदार निवासातील दैनंदिन सेवांवर झाला असून, तेथील कामकाज अंशतः ठप्प झाले आहे.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ आंदोलनात सहभागी झाले आहे. मुंबईतील आमदार निवासासह मंत्रालय, सरकारी रुग्णालये आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी या संपात सहभागी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील सुमारे ४४,००० कर्मचारी संपावर आहेत. त्यामुळे ९,००० गावांमधील महसूल कामकाज थांबले आहे.

## फेरीवाल्यांविरोधात मुंबई हायकोर्टाचे पालिका, पोलिसांना कारवाईचे आदेश

■ मुंबई

**शहरातील** अनधिकृत फेरीवाल्यांच्या समस्येवर उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली. दुपारच्या सत्रात न्यायामूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कलम खाता यांच्या खंडपीठाने तातडीने पोलीस फौज मागून कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

मुंबईतील फेरीवाल्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधणाऱ्या विविध याचिका उच्च न्यायालयात दाखल आहेत. त्या याचिकांवर सोमवारी न्या. अजय गडकरी आणि न्या. कमल खाता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.



यावेळी खंडपीठाने पालिका आणि पोलीस संरक्षणाच्या मुद्यावर गंभीर दखल घेत तातडीने आझाद मैदान आणि माता रमाबाई आंबेडकर पोलिसांचा फौजफाटा मागून पालिका अधिकारी आणि न्यायालयीन मित्र यांना छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ते कुलाबा कॉजवे आणि चर्चगेट या तीन ठिकाणची पाहणी करून कारवाई करण्याचे आणि अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. दरम्यान गोरेगाव पश्चिम येथील बेकायदेशीर फेरीवाल्यांच्या उपद्रव प्रकरणी गोरेगाव मर्चंट्स असोसिएशनने ॲड. आफ्रिन दलाल व ॲड. अनोष इराणी यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेची खंडपिठाने दखल घेतली.

## राज्य सहकारी बँक घोटाळ्याच्या आरोपातून रोहित पवार दोषमुक्त

■ मुंबई

**राज्य** सहकारी बँक कथित घोटाळा प्रकरणात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना मोठा दिलासा मिळाला असून, न्यायालयाने त्यांची दोषमुक्तता केली आहे. या निर्णयानंतर रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करत न्यायालयाचे आभार मानले आहेत. 'सत्य परेशान हो सकता है, मगर पराजित नहीं', असे म्हणत त्यांनी न्यायप्रक्रियेवरील विश्वास व्यक्त केला.

रोहित पवार म्हणाले की, न्यायदेवतेवर आमचा पूर्ण विश्वास असल्याचे मी पहिल्यापासून सांगत होतो. त्यानुसार अखेर घोटाळ्याच्या आरोपातून वगळत ईडीच्या फेऱ्यातून न्यायालयाने सुटका केली, याबाबत न्यायालयाचे मनापासून आभार. 'सत्य परेशान हो सकता है, मगर पराभूत नहीं' हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. पण या प्रकरणात जो काही नाहक त्रास आणि मनस्ताप सहन करावा लागला, त्यावरून आता यापुढच्या पावलाबाबत एवढेच सांगायचे आहे की, 'घायल हूँ, इसलिए घातक हूँ'.

हा कथित घोटाळा राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संबंधित असल्याचा आरोप होता. या बँकांनी सहकारी साखर कारखान्यांना नियमांचे उल्लंघन करून कर्ज वितरित केल्याचे सांगितले जात होते.

## महावितरणचे ३२,६७९ कोटींचे कर्ज महाराष्ट्र सरकार फेडणार

■ मुंबई

**कर्जाच्या** ओझ्याखाली दबलेल्या महावितरण या वीज वितरण कंपनीच्या आर्थिक पुनर्रचनेसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. त्यानुसार महावितरणच्या ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जाची जबाबदारी सरकारने स्वतःकडे घेतली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

महावितरणचे दोन स्वतंत्र कंपन्यांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. बिगर कृषी म्हणजेच घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक ग्राहकांसाठी एक आणि कृषी ग्राहकांसाठी (शेतीच्या कामांसाठी लागणारी वीज) एक अशा दोन स्वतंत्र कंपन्या सरकार स्थापन करण्यात आल्या आहेत. महावितरणचे ३२ हजार ६७९ कोटींचे कर्ज फेडण्यासाठी सरकार १५ वर्षे मुदतीचे दीर्घकालीन सरकारी रोखे (बॉंड) जारी करणार आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे महावितरणवरील ६० हजार कोटींच्या कर्जाचा भार २६ हजार ८४८ कोटी रुपयांवर




येणार आहे. महावितरणला हे कर्ज प्रामुख्याने शेतीच्या कामांसाठी केलेल्या विजेची बिले थकल्यामुळे झाले आहे.


त्यामुळे राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या कृषी ग्राहकांचा भार महावितरणवर पडू नये या उद्देशाने सरकारने एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड ही स्वतंत्र कंपनी स्थापन केली आहे.

## मी मराठी बोलतो! मुंबईतील रिक्षांवर मनसेचे खास स्टिकर

■ मुंबई

**राज्यात** रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या मुद्यावरून वातावरण तापले असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आक्रमक झाली आहे. मराठीला विरोध करणाऱ्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी मनसेने मुंबईतील रिक्षांवर 'मी मराठी बोलतो, मला मराठी समजते, या माझ्या रिक्षात बसा', असे स्टिकर लावण्याची मोहीम सुरू केली आहे.

मुंबईसह उपनगरांमध्ये या मोहिमेला वेग आला असून, मराठी भाषिक चालकांचे संघटन करण्याचा प्रयत्न मनसेकडून केला जात आहे. परिवहन विभागाकडून १ मे म्हणजे महाराष्ट्र दिनापासून राज्यभर विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. राज्यातील ५९ प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत चालक-मालकांच्या मराठी ज्ञानाची पडताळणी केली




जाणार आहे. ज्या चालकांना मराठी वाचता किंवा लिहिता येत नाही, त्यांच्या परवान्यांवर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या निर्णयाच्या समर्थनार्थ मनसे नेते संदीप देशपांडे यांनी विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

## मध्य रेल्वेची वाहतूक सलग तिसऱ्या दिवशी उशिराने

**प्रवाशांचा संताप वाढला**

■ मुंबई

**मुंबईची** लाईफलाईन मानली जाणारी मध्य रेल्वे सध्या प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे. लोकल सेवा सलग तिसऱ्या दिवशी उशिराने धावत होती. यामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

सोमवारी डोंबिवलीजवळ कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या लोकलचा एक डबा रुळावरून घसरला होता. या घटनेनंतर दुरुस्तीच्या कामामुळे दोन दिवस वाहतूक विस्कळीत राहिली. काल सीएसएमटीवर लोकल गाड्या रखडल्या होत्या. तब्बल अर्ध्या तासापासून वाहतूक सेवा विस्कळीत झाली. प्रशासनाने



काम पूर्ण झाल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात आज तिसऱ्या दिवशीही सेवा सुरळीत झालेली नव्हती. कसारा ते सीएसएमटीदरम्यान धावणाऱ्या लोकल गाड्या आज तब्बल ४५ ते ५० मिनिटे उशिराने धावत होत्या.

कल्याण ते ठाणे दरम्यान स्थानकांवर प्रचंड गर्दी उसळली असून, गाड्या अत्यंत धीम्या गतीने धावत आहेत. आज सकाळी कसाराहून सुटलेली पहिलीच लोकल पाऊण तास उशिराने धावली. आसनगावदरम्यान काही लोकल फास्ट ट्रॅकवर वळवण्यात आल्या. मात्र ठाण्यानंतर पुन्हा त्या स्लो ट्रॅकवर चालवण्यात आल्या.

## गोकुळ दूध संघ निवडणुकीवरून राष्ट्रवादी आणि भाजपात वाद

■ कोल्हापूर

**गोकुळ** दूध संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील वाद तीव्र झाला आहे. भाजपा समर्थक अपक्ष आमदार शिवाजी पाटील यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर गोकुळमधील राजकारणावरून गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांमुळे अजित पवार गट आणि भाजपा यांच्यातील संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. गोकुळ निवडणुकीसाठी भाजपा वगळून मित्रपक्षांच्या पॅनलसाठी मुख्यमंत्र्यांची परवानगी घ्यावी, अशी मागणी अजित पवार गटाचे नेते भैया माने यांनी मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे केली आहे. या मागणीनंतर भाजपाकडून जोरदार पलटवार करण्यात आला आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील यांनी अजित पवार गटावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, भाजपा, शिवसेना आणि जनसुराज्य सोडून राष्ट्रवादीचा आणखी कोण छुपा मित्रपक्ष आहे, हे त्यांनी स्पष्ट करावे, कोणत्याही संयुक्त पॅनेलची मागणी करण्यापूर्वी याबाबत स्पष्टता देणे आवश्यक आहे.

## पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणाचा १४ मे रोजी निकाल

**दोन आरोपींविरोधात अटक वॉरंट**

■ मुंबई

**धाराशिव** येथील ज्येष्ठ नेते पवनराजे निंबाळकर यांच्या हत्याकांड प्रकरणात मुंबईतील अतिरिक्त सत्र न्यायाधीश तथा विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांच्या न्यायालयाने १४ मे रोजी निकाल जाहीर करण्याचे निश्चित केले आहे. तब्बल २० वर्षांनंतर या खटल्याचा अंतिम निर्णय दिला जाणार आहे. याचबरोबर या प्रकरणातील दोन आरोपींविरुद्ध न्यायालयाने अटक वॉरंट काढण्याचे आदेश दिले आहेत. कैलास यादव आणि गजेंद्र पांडे अशी आरोपींची नावे असून, त्यांना जामीनपात्र समजून अटक वॉरंट जारी



करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

३ जून २००६ रोजी नवी मुंबईतील कळंबोली येथे पवनराजे निंबाळकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. मुंबईहून धाराशिवकडे जात असताना अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या वाहनाचा पाठलाग करून गोळीबार केला. या हल्ल्यात पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास महाराष्ट्र पोलीस, सीआयडी आणि त्यानंतर सीबीआय अशा तीन तपास यंत्रणांनी केला आहे. सुनावणीवेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यासह १२८ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली.